नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : २०३ | किंमत : ४ रूपये

Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे    POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




शुक्रवार, दि. ०३ जुलै २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

## फडणवीसांचे हे शेवटचे अधिवेशन



मुंबई : (स. गांवकरी)

शिवसेना ठाकरे गटातून दुसऱ्यांदा पक्षांतर झाल्यानंतर महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा एकदा उलथापालथ झाली. ठाकरे गटाच्या सहा खासदारांनी शिंदे गटात प्रवेश केला. तर आदित्य ठाकरे यांच्या जवळचे मानले जाणाऱ्या सचिन अहिर यांनीही नुकताच शिंदे गटात प्रवेश केला असून त्यांची विधानपरिषदेच्या उपसभापती म्हणून वर्णी लागली. ठाकरे गटाच्या फुटीबाबत बोलताना आदित्य ठाकरेंनी हा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना कमकुवत करण्याचा डाव असल्याचे म्हटले आहे.

आदित्य ठाकरे यांनी ठाकरे गटातील फुटीवर भाष्य केले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे केंद्रातील भाजपाच्या ज्येष्ठ नेत्यांच्या इशाऱ्यावर काम करत असून फडणवीस यांच्या राष्ट्रीय राजकारणातील स्थानाला सुरुंग लावण्याचा प्रयत्न केला जात आहे, असाही आरोप आदित्य ठाकरेंनी केला.

आदित्य ठाकरे पुढे म्हणाले, राष्ट्रीय राजकारणात आणि राज्यात ज्या घडामोडी घडत आहेत. त्यात शिवसेनेचा (ठाकरे) नाहक बळी जात आहे. महाराष्ट्रात ज्या ताज्या राजकीय घडामोडी घडल्या त्या 'ऑपरेशन देवेंद्र फडणवीस’चा भाग आहेत.

'ऑपरेशन देवेंद्र फडणवीस' याबद्दल अधिक बोलताना आदित्य ठाकरे म्हणाले की, एकेकाळी राष्ट्रीय राजकारणात ज्यांना संभाव्य दावेदार समजले जात होते, त्यांना एक एक करून पद्धतशीरपणे बाजूला सारले गेले. सध्या राज्यात एकनाथ शिंदेंच्या राजकीय हालचाली या भाजपाच्या केंद्रीय नेतृत्वाच्या इशाऱ्यावर होत आहेत. यातून देवेंद्र फडणवीस हे पंतप्रधानपदाच्या शर्यतीत राहणार नाहीत, असा प्रयत्न केला जात आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे काही दिवसांतच केंद्रीय मंत्रिमंडळात दिसतील, असाही दावा आदित्य ठाकरेंनी केला. महाराष्ट्रात सध्या जी परिस्थिती आहे, ती कायम नसेल, असेही ते म्हणाले.

### पक्षांतर आणि पैशांचा संबंध

शिवसेनेतून (ठाकरे) होत असलेल्या पक्षांतरामागे पैशांची मोठी ताकद कार्यरत असल्याचा आरोपही आदित्य ठाकरे यांनी केला. या आरोपाचे स्पष्टीकरण देताना आदित्य ठाकरेंनी नुकतेच व्हायरल झालेल्या काही व्हिडीओंचा दाखला दिला. ज्यामध्ये शिंदे गटाच्या नेते पैशांबाबत बोलत आहेत, काही ठिकाणी आमदारांच्या घरात पैशांनी भरलेली बॅग दिसत आहे. आदित्य ठाकरे म्हणाले की, शिंदे गटाच्या नेत्यांच्या व्हायरल व्हिडीओवरून महाराष्ट्रातील राजकीय पॅटर्न दिसून येतो. स्वतःच्या आर्थिक उन्नतीसाठी पक्षांतर केल्याचे दिसते. तसेच सत्ताधारी पक्षात गेल्यानंतर काही नेत्यांची संपत्ती अचानक वाढली, असाही दावा आदित्या ठाकरे यांनी केला.

### 'मलाही शिंदेंच्या शिवसेनेची ऑफर होती'

राज्याच्या राजकारणात काही दिवसांपासून 'ऑपरेशन टायगर'ची मोठी चर्चा सुरू आहे. काही दिवसांपूर्वीच 'ऑपरेशन टायगर'च्या माध्यमातून ठाकरे सेनेचे सहा खासदार फुटले. या सहा खासदारांनी शिंदेंच्या सेनेत प्रवेश केला. त्यानंतर विधानपरिषदेचे आमदार सचिन अहिर हे देखील शिंदे सेनेच्या गळाला लागले आहेत. त्यामुळे 'ऑपरेशन टायगर' अद्यापही सुरूच असल्याचं बोललं जात आहे. या सर्व घडामोडींवर बोलत असताना शिवसेना ठाकरे पक्षाचे पुण्यातील नेते वसंत मोरे यांनी एक मोठा दावा केला आहे. 'मलाही शिंदेंच्या शिवसेनेची ऑफर आली होती', असं वसंत मोरे यांनी टीव्ही ९ मराठी या वृत्तवाहिनीशी बोलताना म्हटलं आहे. "सध्या फक्त ऑपरेशनचीच चर्चा आहे. हे सगळे ऑपरेशन करता करता महाराष्ट्र आयसीयूमध्ये पोहोचला आहे, तरी या लोकांचं लक्षच नाहीये. या सर्व लोकांचं फक्त ऑपरेशन टायगर, ऑपरेशन तुतारी, ऑपरेशन ३.० असं सगळं सुरू आहे.

"देवेंद्र फडणवीस यांचे मुख्यमंत्री म्हणून हे शेवटचे विधिमंडळ अधिवेशन आहे. हे माझे शब्द लिहून ठेवा", असाही दावा आदित्य ठाकरेंनी केला. तसेच एकनाथ शिंदे हे पुन्हा एकदा मुख्यमंत्री पद मिळवण्याचा प्रयत्न करतील, असेही ते म्हणाले. आपल्या दाव्याला दुजोरा देण्यासाठी आदित्य ठाकरे यांनी नितीन गडकरी आणि शिवराज सिंह चौहान यांचे उदाहरण दिले. "नितीन गडकरी तिसऱ्यांदा भाजपाचे अध्यक्ष होऊ घातले, तेव्हा त्यांच्याबद्दलचे वाद समोर आले. पूर्ती घोटाळा आणि इतर विषय समोर आले. शिवराज सिंह चौहान मध्य प्रदेशचे यशस्वी मुख्यमंत्री म्हणून नावाजले गेले असताना त्यांना अचानक केंद्रीय मंत्रिमंडळात घेण्यात

## थोडक्यात...

### २९०० शिक्षकेतर पदांना मान्यता

मुंबई (स. गांवकरी) : राज्यातील उच्च शिक्षण क्षेत्रातील प्राध्यापकांची रिक्त पदे भरण्याचा निर्णय सरकारने घेतला असून ५,०१२ नव्या पदांसह १७२ शिल्लक अशी एकूण ५,१७४ प्राध्यापक पदांची भरती सुरू करण्यात आली आहे. ही गेल्या अनेक वर्षांतील सर्वात मोठी प्राध्यापक भरती असल्याची माहिती उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी विधान परिषदेत दिली. त्याचबरोबर महाविद्यालयांतील सुमारे २,९०० शिक्षकेतर पदांना तत्त्वतः मंजुरी देण्यात आली असून निधी उपलब्ध झाल्यानंतर त्यांची भरतीही सुरू करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

### शाळांच्या एनओसीचे नियम कठोर करणार

मुंबई (स. गांवकरी) : सीबीएसई, आसीएसई, आयबी तसेच अन्य खासगी बोर्डाच्या शाळांकडून मनमानी केली जाते. पालकांना महागडी पुस्तके आणि शैक्षणिक साहित्य खरेदीची सक्ती करण्यात येत आहे. अशाप्रकारे अवाजवी शुल्क आकारून सरकारच्या आदेशांचे उल्लंघन होत असल्याबाबत विधान परीषदेत सर्वपक्षीय सदस्यांनी आक्षेप नोंदवला. यावर सरकारकडून उत्तर देताना राज्यमंत्री पंकज भोयर यांनी या शाळांना मान्यता केंद्र सरकार देते. मात्र त्यांना ना-हरकत प्रमाणपत्र (एनओसी) राज्य सरकारकडून दिले जाते. या ना-हरकत प्रमाणपत्राच्या अटी अधिक कठोर करण्याचा निर्णय सरकार घेईल तसेच या शाळांसंदर्भातील तक्रारींच्या निवारणासाठी प्रत्येक जिल्ह्यात समन्वय अधिकाऱ्याची नियुक्ती केली जाईल अशा शब्दांत आश्वस्त केले.

### पंधरा हजार कंत्राटी कर्मचाऱ्यांना दिलासा

मुंबई (स. गांवकरी) : राष्ट्रीय आरोग्य अभियाना (एनएचएम) अंतर्गत १० वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक काळ सेवा बजावलेल्या १५ हजार १० कंत्राटी कर्मचाऱ्यांचे समायोजन करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. या कर्मचाऱ्यांच्या सेवा समायोजनासाठी समकक्ष वेतनश्रेणीतील अधिसंख्य पदे निर्माण करण्यास सरकारने मंजुरी दिली असून त्यासाठी दरवर्षी १,१५३.६० कोटी रुपयांचा खर्चही मंजूर करण्यात आला आहे. त्यामुळे अनेक वर्षांपासून सेवा देणाऱ्या या कंत्राटी कर्मचाऱ्यांना दिलासा मिळाला आहे.

## कोयनेच्या गाळात दडलाय प्राचीन इतिहास; दुर्मीळ गणेशमूर्ती मिळाली



सातारा : (स. गांवकरी)

महाराष्ट्राची भाग्यलक्ष्मी असलेल्या कोयना धरणाने यंदा तळ गाठल्यामुळे विस्थापित झालेली गावे आणि जुनी मंदिरे पुन्हा उघडी पडली आहेत. याचदरम्यान बामणोली-तापोळा परिसरातील कोरड्या पडलेल्या नदीपात्रात 'ढोकरा' शैलीतील एक अत्यंत दुर्मीळ, देखणी आणि सुबक गणेशमूर्ती आढळून आली आहे. ऋषी मुद्रेतील बैठ्या आसनावरील ब्रांझ धातूची ही मूर्ती सध्या इतिहास संशोधक आणि ग्रामस्थांमध्ये कमालीचा कुतूहलाचा विषय ठरली आहे. कोयना धरणाच्या निर्मितीसाठी १९५८ मध्ये संपादन प्रक्रिया सुरू होऊन १९६३ मध्ये धरण पूर्ण झाले. यात जावळी, महाबळेश्वर आणि पाटण तालुक्यातील सुमारे १०५ गावे विस्थापित झाली. यंदा पावसाने पाठ फिरविल्याने जलाशय आटला आणि हे विस्थापित वैभव समोर आले. ही मूर्ती कोणत्याही मंदिराच्या किंवा घराच्या अवशेषात नव्हे, तर थेट गाळाच्या मातीत सापडली आहे. अनेक वर्षे पाण्याच्या आणि गाळाच्या खाली राहूनही ही मूर्ती आजही सुरक्षित आणि सुस्थितीत आहे. आदिवासी कला म्हणून ओळखली जाणारी ही शैली सह्याद्रीतील कृष्णा-कोयना खोऱ्यात आढळल्याने अभ्यासकांमध्ये आश्चर्य व्यक्त होत आहे. ही मूर्ती स्थानिक पातळीवर घडवली गेली की ती बाहेरून आली, याचा उलगडा पुरातत्त्व विभागाच्या सखोल अभ्यासानंतरच होईल. या मूर्तीचे वैज्ञानिक परीक्षण झाल्यास महाराष्ट्राच्या प्राचीन सांस्कृतिक आणि व्यापारी वारशावर नवा प्रकाश पडू शकतो.

ढोकरा कलेला इतिहास काही हजार वर्षांपेक्षा जुना आहे. भारतातल्या अनेक आदिम जनजातींची ही नैसर्गिक कला परंपरा आहे. यामध्ये 'लॉस्ट वॅक्स टेक्निक' वापरून देवी देवतांच्या मूर्ती, बांगड्या, प्राणी तयार केले जातात. या कलेत 'मोटीफ'चा उगम निसर्ग, श्रद्धा विषय, मिथक कथा, चालीरिती यात असतो. मोहेंजोदरो येथे सापडलेली, कमरेवर हात ठेवून उभी असलेल्या शालेय इतिहासाच्या पुस्तकातली मूर्ती या ढोकरा कलेचेच प्रतीक आहे.

**– ॲड. सुमंतिनी नुलकर, वारसास्थळ अभ्यासक, सातारा**

कोयना धरण पात्रामध्ये सापडलेली गणेशमूर्ती ही अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण असून, प्राचीन अशा ढोकरा कला शैलीमध्ये या मूर्तीची निर्मिती करण्यात आलेली आहे. काही अभ्यासकांच्या मते या मूर्तीचा कालखंड काही हजार वर्षे मागे जातो. कोयना परिसरात सापडलेली मूर्ती म्हणजे इतिहास अभ्यासक, मूर्ती अभ्यासक आणि कलाप्रेमी मंडळींसाठी एक अनमोल ठेवा आहे.

**– आदित्य चौडे, इतिहास अभ्यासक आणि लेखक**

## वन्यप्राण्यांच्या अवयवांची तस्करी उघड; ६ बिबट नखांसह मुद्देमाल जप्त ; एकाला अटक

सावंतवाडी : (स. गांवकरी)



सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कुडाळ बाजारपेठ येथे 'मसुरकर जेम्स' या दुकानावर वनविभागाने छापा टाकून वन्यप्राण्यांच्या अवयवांची मोठी तस्करी उघडकीस आणली आहे. या कारवाईत ६ बिबट नखे, २० बिबट नखांचे अवयव, २ बिबटचे सुळे (दात) आणि वन्यप्राण्यांच्या शिंगापासून तयार केलेली ६ नखे असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी दुकानाचा मालक अजित वसंत मसुरकर याला अटक करण्यात आली असून, न्यायालयाने त्याला २ दिवसांची वन कोठडी सुनावली आहे.

याबाबत वनविभागाने दिलेल्या माहितीनुसार, वनक्षेत्रपाल यांना कुडाळ बाजारपेठ येथील मसुरकर जेम्स या दुकानात वन्यप्राण्यांच्या अवयवांची बेकायदेशीर विक्री होत असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे वनक्षेत्रपाल आणि वनपरिक्षेत्र अधिकारी कुडाळ यांच्या संयुक्त पथकाने दोन पंचांसमक्ष सदर दुकाची झडती घेतली. या झडतीदरम्यान वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ च्या अनुसुची-१ मधील संरक्षित प्राणी असलेल्या बिबट्याची शिकार करून, त्यापासून मृगयाचिन्हे तयार करून विक्री करण्याच्या उद्देशाने ठेवलेला मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी सावंतवाडी वनविभागाने गुन्हा नोंदवला आहे. त्याला कुडाळच्या प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालयात हजर केले असता, न्यायालयाने त्याला दोन दिवसांची वन कोठडी सुनावली. सदरची मोठी कारवाई उपवनसंरक्षक सावंतवाडी मिलीश शर्मा तसेच सहाय्यक वनसंरक्षक डॉ. सुनील लाड यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.






# महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचा गुणवंत विद्यार्थी गौरव सोहळा उत्साहात

## राज्यस्तरीय शैक्षणिक पुरस्कारांचेही वितरण!

**अकोले : (स. गांवकरी)**

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई व महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेला गुणवंत विद्यार्थी गौरव सोहळा गुरुवार, दि. २ जुलै २०२६ रोजी इंदोरी फाटा येथील मातोश्री लॉन्स येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. दहावी, बारावी तसेच विविध स्पर्धा परीक्षांमध्ये उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा यावेळी मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. तसेच शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शिक्षक, मुख्याध्यापक व शिक्षणसेवकांना राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेश सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे होते. प्रमुख पाहुणे म्हणून थोर समाजसेवक व एन. के. टी. ट्रस्टचे अध्यक्ष शेठ नानजीभाई खेमजीभाई ठक्कर, मा. कुणाल सोनवणे (उपविभागीय पोलीस अधिकारी, संगमनेर), शिवसेनेचे ज्येष्ठ नेते प्रभाकर फापाळे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नेत्या पुष्पाताई लहामटे, महिला आघाडी प्रमुख निताताई आवारी, समाजसेवक राजेंद्र पांडे, प्रदेश प्रसिद्ध प्रमुख नवनाथ जाधव, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे कोल्हापूर जिल्हा अध्यक्ष बाजीराव फराटे, उत्तर महाराष्ट्र विभागीय सचिव अनिल रहाणे, प्रवरा माध्यमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सविता मेहेत्रे, सामाजिक कार्यकर्ते बिरबल वाकचौरे, सौ. परीघा विश्वासराव आरोटे, सुनील धुमाळ, अनिल रहाणे, पत्रकार संघाचे अकोले तालुका अध्यक्ष अशोक उगले, इलेक्ट्रॉनिक मीडिया अध्यक्ष सचिन खरात, कार्याध्यक्ष दत्ता जाधव, सचिव हरिभाऊ फापाळे, अकोले शहराध्यक्ष सुनील शेणकर, हल्ला विरोधी समितीचे अध्यक्ष शंकर संगारे, सहसचिव सचिन लगड, हरिभाऊ आवारी, जगन्नाथ आहेर, ललित मुतडक, गणेश रेवगडे, तालुका संपर्क प्रमुख संजय गायकर, सुनील आरोटे, संजय फुलसुंदर, अक्षय आभाळे, राजेंद्र राठोड, सुरेश देशमुख, दत्ता हासे, प्रवीण धुमाळ, राजेंद्र मालुंजकर, शांताराम सोनवणे, गणेश आवरी, सुरेश देशमुख, विजय शेळके यांची प्रमुख उपस्थिती लाभली.













यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ व महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे पदाधिकारी, कार्यकारिणी सदस्य, पत्रकार, शिक्षक, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमात तालुक्यातील माध्यमिक, उच्च माध्यमिक आणि आश्रमशाळांमधील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्र आणि पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण, स्पर्धा परीक्षा, व्यक्तिमत्त्व विकास आणि सामाजिक बांधिलकी याबाबत मार्गदर्शन करत सातत्यपूर्ण परिश्रम, शिस्त आणि गुणवत्तेच्या जोरावर यश संपादन करण्याचा संदेश दिला.

यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने जाहीर करण्यात आलेल्या राज्यस्तरीय शैक्षणिक पुरस्कारांचेही वितरण करण्यात आले. शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल शिक्षण महर्षी राघू सावळेराम जाधव यांना प्रतिष्ठेचा जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. तसेच विजय धुंदा कातडे यांना आदर्श शिक्षक पुरस्कार, जगन्नाथ एकनाथ जाधव, संजय बाबुराव उकिरडे आणि प्रल्हाद भिवसेन नेहे यांना आदर्श मुख्याध्यापक पुरस्कार तर दिव्यांग क्रीडा शिक्षक पुरस्कार कैलास सखाराम कोते यांना देऊन सन्मानित करण्यात आले.

अनिल रहाणे व सचिन लगड यांनी प्रभावी सूत्रसंचालन केले, तर अध्यक्षीय सूचना हरिभाऊ फापाळे यांनी मांडल्या, बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमास प्रारंभ झाला तसेच सर्व शालेय विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व यशस्वी विद्यार्थ्यांना पारितोषिक, सर्टिफिकेट व शालेय साहित्याचे वितरण करण्यात आले, कार्यक्रमाच्या शेवटी अशोकराव उगले यांनी उपस्थितांचे आभार मानले. हा कार्यक्रमयशस्वी करण्यासाठी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई व महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, मुंबईच्या सर्व पदाधिकारी, कार्यकारिणी सदस्य आणि स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले. अकोले तालुक्यातील विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचा गौरव आणि शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांचा सन्मान या दुहेरी उद्देशाने आयोजित करण्यात आलेला हा सोहळा अकोले तालुक्यातील शैक्षणिक क्षेत्रासाठी प्रेरणादायी ठरला.

# "मेहनतीशिवाय यश नाही; सरस्वतीचा आशीर्वाद मिळाला की लक्ष्मी आपोआप येते" – समाजसेवक नानजीभाई ठक्कर




**अकोले : (स. गांवकरी)**

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई व महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित गुणवंत विद्यार्थी गौरव सोहळ्यात दानशूर समाजसेवक तथा एन.के.टी. ट्रस्टचे अध्यक्ष शेठ नानजीभाई खेमजीभाई ठक्कर यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. मेहनत, संस्कार, आई-वडिलांचा सन्मान, शिक्षकांविषयी आदर आणि समाजाला देण्याची वृत्ती या यशाच्या पंचसूत्रीवर त्यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.






आपल्या भाषणात ते म्हणाले, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्यभरात सुमारे २७ हजार सदस्य असून, समाजहिताचे अनेक उपक्रम संघ सातत्याने राबवत आहे. डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या नेतृत्वाखाली संघ गेल्या अनेक वर्षांपासून विद्यार्थी, शिक्षक आणि समाजासाठी उल्लेखनीय कार्य करीत असल्याचे त्यांनी गौरवोद्गार काढले.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना त्यांनी सांगितले की, "यश कोणाकडून मागून मिळत नाही. देवही यश देत नाही; यश आपल्या मेहनतीतून आणि कर्मातून मिळते. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याने कठोर परिश्रम, सातत्य आणि प्रामाणिकपणा अंगीकारला पाहिजे."

आजच्या पिढीसमोर मोबाईलचे वाढते आकर्षण ही मोठी समस्या असल्याचे नमूद करत त्यांनी विद्यार्थ्यांना अभ्यासावर लक्ष केंद्रित करण्याचे आवाहन केले. मोबाईलचा अतिरेकी वापर टाळून ज्ञानार्जनासाठी वेळ द्यावा, असे सांगताना त्यांनी अनेक प्रशासकीय अधिकारी, डॉक्टर, चार्टर्ड अकाउंटंट आणि परदेशात कार्यरत असलेले हजारो विद्यार्थी आपल्या संस्थेतून घडल्याचा उल्लेख केला.

शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करताना ते म्हणाले, "सरस्वती ही मोठी बहीण आहे, तर लक्ष्मी ही धाकटी बहीण आहे. ज्या व्यक्तीकडे ज्ञान येते, त्याच्याकडे संपत्ती आपोआप येते. त्यामुळे प्रथम ज्ञान मिळवा, यश तुमच्या पाठीशी उभे राहील."

विद्यार्थ्यांनी दररोज आई-वडील, शिक्षक आणि गुरूजनांना नमस्कार करावा, त्यांच्या आशीर्वादातूनच जीवनात यश मिळते, असे सांगत त्यांनी 'मातृदेवो भव, पितृदेवो भव, आचार्य देवो भव' या भारतीय संस्कृतीतील मूल्यांचे महत्त्व स्पष्ट केले. आई-वडिलांचा अपमान करून मिळविलेले मोठे पदही निरर्थक ठरते, असे ते म्हणाले.






आपल्या समाजकार्याचा उल्लेख करताना त्यांनी सांगितले की, देशभरातील शाळा, मंदिरे, सामाजिक संस्था, आपत्तीग्रस्त आणि गरजूंसाठी एन.के.टी. ट्रस्टच्या माध्यमातून सातत्याने मदत केली जाते. अनेक शैक्षणिक संस्थांना साहित्य, पायाभूत सुविधा तसेच विविध सामाजिक उपक्रमांसाठी आर्थिक सहाय्य देण्यात आले असून, हे कार्य भविष्यातही सुरू राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.

"समाजाकडून घेण्यापेक्षा समाजाला देण्यातच खरा आनंद आहे," असे सांगताना त्यांनी दानधर्माची प्रेरणा विद्यार्थ्यांना दिली. "देणाऱ्याचा कधी तोटा होत नाही; समाजासाठी दिलेले प्रत्येक योगदान अनेक पटींनी परत मिळते," असा संदेश त्यांनी दिला.

पत्रकार संघाच्या कार्याचे कौतुक करताना त्यांनी डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या सामाजिक बांधिलकीचा विशेष उल्लेख केला. विद्यार्थ्यांचा गौरव, शिक्षकांचा सन्मान आणि शैक्षणिक साहित्य वाटप यांसारखे उपक्रम समाजासाठी प्रेरणादायी असल्याचे त्यांनी नमूद केले.

शेवटी त्यांनी विद्यार्थ्यांना मोठी स्वप्ने पाहण्याचे आवाहन करत, "आज या सभागृहात बसलेल्यांमधून उद्याचे कलेक्टर, पोलीस अधिकारी, डॉक्टर, अभियंते, शास्त्रज्ञ आणि आदर्श नागरिक घडतील. मात्र त्यासाठी मेहनत, संस्कार आणि शिस्त या तीन गोष्टी कधीही सोडू नका," असा प्रेरणादायी संदेश दिला.

शेठ नानजीभाई ठक्कर यांच्या प्रभावी, अनुभवसमृद्ध आणि प्रेरणादायी मार्गदर्शनाला उपस्थित विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत टाळ्यांच्या कडकडाटात दाद दिली.

# शिक्षण, समाजसेवा आणि गुणवंतांचा सन्मान हीच भविष्याची गुंतवणूक – डॉ. विश्वासराव आरोटे!

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई व महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित गुणवंत विद्यार्थी गौरव सोहळा गुरुवार (दि. २ जुलै) रोजी इंदोरी फाटा येथील मातोश्री लॉन्स येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. दहावी, बारावी, एमपीएससी, यूपीएससी तसेच विविध स्पर्धा परीक्षांमध्ये उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा यावेळी मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. त्याचबरोबर शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शिक्षक, मुख्याध्यापक आणि शिक्षणसेवकांना राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले.

## अकोलेत गुणवंत विद्यार्थी गौरव सोहळा उत्साहात

**अकोले : (स. गांवकरी)**

**कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेश सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे होते.**

यावेळी अध्यक्षीय मार्गदर्शन करताना डॉ. विश्वासराव आरोटे यांनी गुरुंचे स्मरण करून आपल्या भाषणाची सुरुवात केली. गेल्या २५ वर्षांपासून महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या माध्यमातून अकोले तालुक्यात गुणवंत विद्यार्थी गौरव सोहळा सातत्याने आयोजित केला जात असून, शिक्षण क्षेत्राला बळ देण्याचा हा एक सामाजिक उपक्रम असल्याचे त्यांनी सांगितले.

ते म्हणाले की, प्रत्येक आई-वडिलांचे स्वप्न आपल्या मुलांनी यशस्वी व्हावे आणि त्यांच्या कर्तृत्वाचा सन्मान व्हावा, असे असते. त्या स्वप्नपूर्तीचा आनंद या गुणगौरव सोहळ्याच्या माध्यमातून मिळत आहे. विद्यार्थ्यांचा गौरव हा केवळ पुरस्कार नसून त्यांच्या परिश्रमाला समाजाकडून मिळालेली मानाची पावती आहे.

डॉ. आरोटे यांनी एन.के.टी. ट्रस्टचे अध्यक्ष शेठ नानजीभाई खेमजीभाई ठक्कर यांच्या दानशूर वृत्तीचे विशेष कौतुक केले. समाजातील गरजू, शैक्षणिक संस्था, विद्यार्थी आणि आपत्तीग्रस्तांसाठी ते वर्षाचे ३६५ दिवस मदतीचा हात पुढे करत असल्याचे त्यांनी सांगितले. अनेक शाळांना फरशा, शैक्षणिक साहित्य, आवश्यक सुविधा तसेच विविध सामाजिक उपक्रमांसाठी त्यांनी सातत्याने सहकार्य केले असल्याचा उल्लेखही त्यांनी केला. समाजातील दानशूर व्यक्तींनी शिक्षणासाठी पुढे यावे, असे आवाहन त्यांनी यावेळी केले. उपविभागीय पोलीस अधिकारी कुणाल सोनवणे यांच्या कर्तव्यदक्षतेचाही त्यांनी गौरव केला. पोलीस प्रशासन समाजात कायदा व सुव्यवस्था राखण्याबरोबरच युवकांसाठी प्रेरणास्थान असल्याचे सांगत विद्यार्थ्यांनी प्रामाणिकपणा, शिस्त आणि सामाजिक जबाबदारी जोपासावी, असा संदेश त्यांनी दिला.

यावेळी तालुक्यातील सुमारे ९० माध्यमिक विद्यालये, ३२ आश्रमशाळा, उच्च माध्यमिक विद्यालये तसेच एमपीएससी, यूपीएससी व इतर स्पर्धा परीक्षांमध्ये यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्र आणि शुभेच्छा देत त्यांच्या उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा व्यक्त करण्यात आल्या.











कार्यक्रमात शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल शिक्षण महर्षी राघू सावळेराम जाधव यांना जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. तसेच आदर्श शिक्षक, आदर्श मुख्याध्यापक आणि शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या विविध शिक्षकांचा राज्यस्तरीय पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. ग्रामीण व दुर्गम भागात शिक्षणाची ज्योत तेवत ठेवणाऱ्या शिक्षकांचा सन्मान करणे ही समाजाची जबाबदारी असल्याचे डॉ. आरोटे यांनी स्पष्ट केले.

पत्रकार संघाच्या कार्याची माहिती देताना त्यांनी सांगितले की, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ हा समाजाकडून घेणारा नव्हे, तर समाजाला देणारा पत्रकार संघ आहे. विद्यार्थ्यांना वह्या, दप्तर, शालेय साहित्य, शाळांना आवश्यक साहित्य, आपत्तीग्रस्तांना मदत आणि विविध सामाजिक उपक्रम सातत्याने राबविले जात असून, भविष्यातही हे कार्य अधिक व्यापक स्वरूपात सुरू राहणार आहे.

# “कठोर परिश्रम करा आणि व्यसनांपासून दूर राहा”



















## उपविभागीय पोलीस अधिकारी कुणाल सोनवणे!

अकोले : (स. गांवकरी)

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई व महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित गुणवंत विद्यार्थी गौरव सोहळ्यात संगमनेरचे उपविभागीय पोलीस अधिकारी कुणाल सोनवणे यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. यशासाठी मोठी स्वप्ने, कठोर परिश्रम, आई-वडील व गुरुजनांचे आशीर्वाद आणि व्यसनमुक्त जीवन ही चार सूत्रे विद्यार्थ्यांनी कायम लक्षात ठेवावीत, असा मोलाचा संदेश त्यांनी दिला.

आपल्या भाषणाच्या प्रारंभी त्यांनी गुणवंत विद्यार्थी, त्यांचे पालक, शिक्षक आणि मुख्याध्यापकांचे अभिनंदन केले. वर्षभर विद्यार्थ्यांनी घेतलेल्या मेहनतीचे हे फलित असून, गुणवंत विद्यार्थ्यांबरोबरच त्यांना घडविणाऱ्या शिक्षकांचाही सन्मान होत असल्याने हा सर्वांसाठी अभिमानाचा क्षण असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना यश आणि अपयशाकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टिकोन दिला. "यश मिळाले तर ते नम्रतेने स्वीकारावे आणि अपयश आले तर धैर्याने त्याचा सामना करावा. आयुष्यात पुढे जाण्यासाठी हेच खरे यशाचे सूत्र आहे," असे ते म्हणाले. स्वतःच्या शालेय जीवनातील आठवणी सांगताना त्यांनी नगरपालिकेच्या छोट्या शाळेत शिक्षण घेतल्याचे सांगितले. शाळा लहान असली तरी शिक्षकांची विद्यार्थ्यांप्रती असलेली तळमळ आणि मेहनत मोठी होती. त्याच शिक्षकांच्या मार्गदर्शनामुळे त्यांच्या वर्गातील अनेक विद्यार्थी आज विविध क्षेत्रांत यशस्वी झाले असल्याचे त्यांनी नमूद केले. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याने आयुष्यभर आपल्या शिक्षकांविषयी कृतज्ञता बाळगावी, असे आवाहन त्यांनी केले.

विद्यार्थ्यांशी संवाद साधताना त्यांनी यशाच्या चार महत्त्वाच्या पायऱ्या स्पष्ट केल्या. पहिली म्हणजे मोठे स्वप्न पाहणे. प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या आयुष्यात काय बनायचे आहे, हे स्पष्ट ध्येय निश्चित करावे. यासाठी त्यांनी युवा क्रिकेटपटू वैभव सूर्यवंशी याचे उदाहरण देत, लहान वयात मोठे स्वप्न पाहून सातत्याने मेहनत केल्यामुळेच यश मिळते, असे सांगितले.

दुसरी पायरी म्हणजे कठोर परिश्रम. केवळ स्वप्ने पाहून यश मिळत नाही, तर त्यासाठी सातत्याने अभ्यास, सराव आणि कष्ट करावे लागतात. मेहनतीला कोणताही पर्याय नसल्याचे त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितले. तिसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे आई-वडील आणि गुरुजनांचे आशीर्वाद. पालक आणि शिक्षक रागावतात ते विद्यार्थ्यांच्या हितासाठीच असते. त्यांच्या सूचनांकडे सकारात्मक दृष्टीने पाहून त्यांचे मार्गदर्शन स्वीकारल्यास यश निश्चित मिळते, असे त्यांनी सांगितले. चौथी आणि अत्यंत महत्त्वाची बाब म्हणजे व्यसनांपासून दूर राहणे. आजच्या काळात मोबाईल, सोशल मीडिया आणि इतर व्यसनांचे वाढते आकर्षण विद्यार्थ्यांसाठी धोकादायक ठरत असल्याचे त्यांनी सांगितले. कोणत्याही प्रकारच्या व्यसनाच्या आहारी गेलेल्या व्यक्तीचे आयुष्य उद्ध्वस्त होते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी लहान वयापासूनच व्यसनमुक्त राहण्याचा निर्धार करावा, असे आवाहन त्यांनी केले.

विद्यार्थ्यांनी स्पष्ट ध्येय निश्चित करून त्यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न करावेत. शिस्त, संयम, सकारात्मक विचार आणि सातत्यपूर्ण परिश्रम यांच्या बळावर प्रत्येक विद्यार्थी आपल्या जीवनात मोठे यश संपादन करू शकतो, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. शेवटी त्यांनी गुणवंत विद्यार्थ्यांना, शिक्षकांना आणि मुख्याध्यापकांना शुभेच्छा देत, "आजचा सन्मान हा तुमच्या पुढील यशस्वी वाटचालीची सुरुवात आहे. मोठी स्वप्ने पाहा, त्यासाठी मेहनत करा आणि समाजाचे आदर्श नागरिक बना," असा प्रेरणादायी संदेश दिला.


























## निविदा सूचना नोटीस क्र. १/२०२६ - २७

### पंचायत समिती आंबेगाव ता.आंबेगाव, जि.पुणे

मा. गटविकास अधिकारी (उ.श्रे.) पंचायत समिती आंबेगाव सन २०२६-२०२७ करिता खाली नमूद केलेल्या कामांची सिलबंद निविदा सार्वजनिक बांधकाम / जिल्हा परिषद पुणे यांचेकडील नोंदणीकृत ठेकेदाराकडून बंद लिफाफा पद्धतीने मागवित आहोत. कोरी निविदांचा नमुना पंचायत समिती आंबेगाव (घोडेगाव) ता.आंबेगाव, जि.पुणे या कार्यालयात सुट्टीचे दिवस वगळून दिनांक ०३/०७/२०२६ ते दिनांक- ०९/०७/२०२६ या कालावधीमध्ये कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी ९.४५ ते सायंकाळी ६.१५ या वेळेत विक्रिस उपलब्ध होतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | लेखाशिर्ष | अंदाज पत्रकिय रक्कम | अनामत रक्कम | कोरी निविदा रक्कम | काम पुर्ण करण्याचा कालावधी | नोंदणीकृत कंत्राट दाराचा वर्ग | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे धामणी येथे श्रीरामनगर येथे रस्ता करणे. ता. आंबेगाव. | अन्वये (२२३५१४६६-२७ मागास वर्गीय वस्तीचे सर्वांगीन विकासासाठी रस्ते/ पाणी पुरवठा/ समाजमंदिर/ सभामंडप/ गटर/ गटर बांधकाम व इतर सोयी सुविधा करणे. | ८४५१४५ /- | १०,००० /- | ५९० /- | ३ महिने | सर्व साधारण (खुला) वर्ग १ ते ७ पर्यंत. | |
| २ | मौजे अवसरी बु. येथील अण्णा भाऊ साठे नगर येथील समाज मंदिर बांधकाम करणे. ता. आंबेगाव. | अनु. जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्तीचा विकास करणे.(जिल्हा नियोजन निधी सन २०२५-२६ २२२५४७२-३१(एन.एन.२१००१५) | ५९२३३८ /- | ७,००० /- | ५९० /- | ३ महिने | मजुर सहकारी संस्था. | |

**टिप :-** १) ठेकेदाराने कोरी निविदा मागणी अर्जासोबत नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. २) बंद लिफाफा पोस्टाने किंवा समक्ष दिनांक -०९/०७/२०२६ रोजी कार्यालयीन वेळेत पोहोचणे आवश्यक आहे. ३) सदर कामाबाबत निविदा अटी व शर्ती इ. बाबतचा तपशिल निविदा संचात नमूद असून त्या अटी व शर्तीस अधिन राहून निविदाधारक / ठेकेदारास लागू राहतील याची नोंद घ्यावी. ४) विहित मुदती नंतर बंद लिफाफा (दरपत्रके) स्विकारली जाणार नाहीत. ५) प्राप्त निविदा / दरपत्रके दिनांक -१०/०७/२०२६ रोजी सकाळी ११-०० वाजता सर्वांसमक्ष उघडली जातील याची नोंद घ्यावी. ६) दरपत्रकांबाबत काही हरकत असल्यास त्याच ठिकाणी समक्ष घेणेत यावी. ७) दरपत्रक / निविदा स्विकृतीनंतर तक्रार / हरकत विचारात घेतली जाणार नाही. ८) सदर कामाची अनामत, दरपत्रक स्विकारणे अथवा नाकारणे त्या मंजूर अगर नामंजूर करण्याचे अधिकार राखून ठेवले आहेत. ९) वरील अटी व शर्तीस अधिन राहून दरपत्रके सादर करावीत.

उप अभियंता
जि.प.बांधकाम उपविभाग आंबेगाव

गट विकास अधिकारी (उ.श्रे.)
पंचायत समिती आंबेगाव

महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक
समर्थ गांवकरी



# ढवळपुरीचे श्रीराम मंदिर भावी पिढ्यांसाठी प्रेरणास्थान

- महंत रामगिरी महाराज
- लोकसहभागातून साकारलेल्या ढवळपुरीतील भव्य श्रीराम मंदिराचा लोकार्पण सोहळा संपन्न
- भाविकांची अलोट गर्दी!




पारनेर : (स. गांवकरी)

श्रीराम मंदिर हे केवळ श्रद्धेचे केंद्र नसून समाजाला एकत्र आणणारे संस्कारपीठ आहे. ग्रामस्थांनी एकोप्याने उभारलेले ढवळपुरीचे हे मंदिर भावी पिढ्यांसाठी प्रेरणास्थान ठरेल. प्रभू श्रीरामांच्या आदर्शांचे पालन करून समाजात सद्भावना, सेवा आणि संस्कार जोपासावेत, असे प्रतिपादन महंत रामगिरी महाराज यांनी केले. तालुक्यातील ढवळपुरी येथे ग्रामस्थांच्या अभूतपूर्व लोकसहभागातून उभारण्यात आलेल्या भव्य श्रीराम मंदिराचा मूर्ती प्राणप्रतिष्ठा, कलशारोहण व मंदिर लोकार्पण सोहळा अत्यंत भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. तीन दिवस चाललेल्या या ऐतिहासिक धार्मिक सोहळ्याला परिसरातील हजारो भाविकांनी हजेरी लावत श्रीरामांच्या दर्शनाचा लाभ घेतला.

सोहळ्याची सुरुवात प्रभू श्रीराम आणि महंत रामगिरी महाराज यांच्या भव्य मिरवणुकीने झाली. या मिरवणुकीत दुर्गा देवी विद्यालय व आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. ढोल-ताशांचा गजर, पारंपारिक वाद्ये आणि 'जय श्रीराम'च्या जयघोषाने संपूर्ण ढवळपुरी नगरी दुमदुमून गेली होती.

मुख्य सोहळ्याच्या दिवशी महंत रामगिरी महाराज यांच्या शुभहस्ते कलशारोहण, श्रीराम मूर्तीची प्राणप्रतिष्ठा, महापूजन, कलश कुंभाभिषेक, महाआरती आणि कीर्तनसेवा संपन्न झाली. या तीन दिवसीय महोत्सवात वास्तुशांती, ग्रामप्रदक्षिणा, गणेश पूजन, नवग्रह स्थापना, रुद्र, विष्णू व रामयाग, होम-हवन, विविध अधिवास विधी आणि दुर्गामातेची कावड यात्रा असे विविध धार्मिक विधी शास्त्रोक्त पद्धतीने पार पडले.



संगमनेर खुर्द : संगमनेर तालुक्यातील निमगाव खुर्द येथील युवकाने आपला वाढदिवस चक्क स्मशानभूमीत वृक्षारोपण करून साजरा केला. विजय भारत कासार या उद्योजक युवकाने आपला वाढदिवस सोंगा-ढोंगात साजरा न करता गावात व संपूर्ण पंचक्रोशीत एक आदर्श निर्माण व्हावा यासाठी त्याने आपला वाढदिवस कोणत्याही पंचतारांकित हॉटेलमध्ये किंवा झगमगटात साजरा न करता स्मशानभूमीत नारळाचे रोपे लावून वाढदिवस साजरा करून एक आदर्श निर्माण केला आहे.

## थोडक्यात बातम्या...



### मेहता कुटुंबाची भाजप पदाधिकाऱ्यांकडून सांत्वन भेट

हदगाव (स. गांवकरी) : हदगाव येथील प्रतिष्ठित जुने हॉटेल व्यावसायिक तसेच पतंजली आयुर्वेदाचार्य गणेश मेहता यांचे वडील आणि भाजप महिला मोर्चा हदगाव तालुकाध्यक्ष सौ. ममता अर्जुन जोशी यांचे मोठे बाबा (वडील) स्व. रोडजीभाई उदयरामजी मेहता यांचे वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. या दुःखद प्रसंगी भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष ॲड. किशोरभाऊ देशमुख यांनी मेहता कुटुंबीयांची प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले व स्व. रोडजीभाई मेहता यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. यावेळी भाजप हदगाव पुर्व मंडळ अध्यक्ष भागवत देवसरकर, हदगांव मंडळअध्यक्ष बाळापाटील, मंडळ महामंत्री अवधूत कदम, नगरसेवक नामदेव वाकोडे, भास्कर डोईफळे, ऍड. नंदकुमार वारकड यांनीही मेहता कुटुंबीयांची भेट घेऊन दुःखात सहभागी होत कुटुंबीयांना धीर दिला.याप्रसंगी उपस्थित मान्यवरांनी स्व. रोडजीभाई मेहता यांच्या साध्या, प्रेमळ आणि समाजाभिमुख व्यक्तिमत्त्वाच्या आठवणींना उजाळा देत त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभावी, अशी ईश्वरचरणी प्रार्थना केली.

### सिडको मातंग समाज बांधवांच्या वतीने जोडोमार आंदोलन

नवीन नांदेड (स. गांवकरी) : अनुसुचित जातींच्या आरक्षण उपवर्गीकरणाला विरोध करणारे काँग्रेस नेते आ.नाना पटोले व आ विजय वडेट्टीवार यांचा सिडको मातंग समाज बांधवांच्या वतीने जोडेमारो आंदोलन अण्णा भाऊ साठे स्मारक येथे 2 जुलै 26 रोजी समाजबांधव व पदाधिकारी यांच्या उपस्थितीत करण्यात आले.महाराष्ट्रातील मातंग समाजाची गेल्या अनेक दशकापासून अनुसूचित जातीच्या आरक्षणात उपवर्गीकरण व्हावे ही मागणी आहे. त्याबाबतमा.सर्वोच्च न्यायालयाने 1ऑगस्ट 2024 रोजी दिलेल्या निर्णयाद्वारे महाराष्ट्र लगतच्या तेलंगणा व कर्नाटक राज्यांमध्ये अनुसूचित जातीमध्ये आरक्षणाचे उपवर्गीकरण झाले असून महाराष्ट्रातही उपवर्गीकरण व्हावे याबाबत मा .उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश न्यायमूर्ती बदर साहेब यांच्या अध्यक्षतेखाली बदर आयोग गठीत करण्यात होता. मा.बदर आयोगाने आपला अहवाल शासनाकडे सादर केला आहे. त्यावरून उपवर्गीकरण होईल आणि मातंग समाजाला न्याय मिळेल असे महाराष्ट्रातील तमाम मातंग समाजाला वाटत असताना महाराष्ट्रातील काँग्रेसचे नेते आमदार नानाभाऊ पटोले व आमदार विजय वडेट्टीवार यांनी सभागृहामध्ये अनुसूचित जातीच्या उपवर्गीकरणाला विरोध दर्शविला आहे. यामुळे महाराष्ट्रातील तमाम मातंग समाजामध्ये काँग्रेस व काँग्रेसच्या नेत्याच्या विरुद्ध असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्याचा रोष म्हणून सिडको नवीन नांदेड येथील सकल मातंग समाजाने काँग्रेस नेते आमदार नानाभाऊ पटोले व आमदार विजय वडेट्टीवार यांचा तीव्र निषेध करत त्यांच्या प्रतिमेला डॉ.अण्णाभाऊ साठे चौक सिडको नवीन नांदेड येथे जोडे मारो आंदोलन केले आहे.

### बापाच्या कष्टाच्या पैशावर मैत्रिणीच्या मदतीने मुलाचा डल्ला

नायगाव (स. गांवकरी) : नायगाव शहरातील व्यंकटेश नगर परिसरात घडलेल्या ९ लाख ७० हजार रुपयांच्या चोरीचा स्थानिक गुन्हे शाखेने छडा लावत धक्कादायक वास्तव समोर आणले आहे. या चोरीमागे बाहेरील टोळी नसून तक्रारदाराचाच मुलगा मास्टरमाईंड असल्याचे निष्पन्न झाल्याने शहरात एकच खळबळ उडाली आहे. विशेष म्हणजे, या गुन्ह्यात त्याला एका मैत्रिणीची साथ लाभल्याचेही तपासात समोर आले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, तक्रारदाराने प्लॉट खरेदीसाठी आणि इतर आर्थिक गरजांसाठी घरात ९ लाख ७० हजार रुपयांची रोकड जपून ठेवली होती. मात्र, घरातील ही मोठी रक्कम अचानक गायब झाल्याचे लक्षात येताच कुटुंबीयांच्या पायाखालची जमीन सरकली. याप्रकरणी नायगाव पोलिस ठाण्यात तक्रार दाखल होताच स्थानिक गुन्हे शाखेने तपासाची सूत्रे हाती घेतली. तपासादरम्यान पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी करून घरातील हालचाली, कुटुंबीयांचे जबाब, तसेच परिस्थितीजन्य पुरावे यांची सखोल छाननी केली. सुरुवातीला घरफोडीचा आभास निर्माण करण्याचा प्रयत्न झाल्याचे दिसून आले; मात्र पोलिसांच्या बारकाईच्या तपासात अनेक बाबी संशयास्पद आढळल्या. त्यानंतर संशयाची सुई घरातीलच एका व्यक्तीकडे वळली आणि पोलिसांनी तक्रारदाराच्या मुलाला ताब्यात घेऊन चौकशी सुरू केली.

### मुख्य कार्यकारी अधिकारीपदी महेश पाटील रुजू

नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : नांदेड जिल्हा परिषदेचे नूतन मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील यांनी आज पदभार स्वीकारला. प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी पदाची सूत्रे महेश पाटील यांच्याकडे सुपूर्द केली. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले. महेश पाटील हे यापूर्वी सारथी संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक म्हणून कार्यरत होते. शासनाने त्यांची नांदेड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारीपदी नियुक्ती केल्यानंतर त्यांनी आज जिल्हा परिषद कार्यालयात पदभार स्वीकारला.

# बिलोली पुरवठा विभागात खाजगी व्यक्तीचा भोंगळ कारभार

- गरिबांची आर्थिक पिळवणूक
- पुरवठा अधिकाऱ्याचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष
- दोन हजार द्या रेशनकार्ड मिळवा नन्हेसाबची मनमानी



बिलोली : (स. गांवकरी)

ज्या गोरगरिबांच्या चुली पेटवण्यासाठी शासन 'अंत्योदय' आणि 'प्राधान्य कुटुंब योजना' राबवते, त्याच योजनांना बिलोली तहसीलच्या पुरवठा विभागात भ्रष्टाचाराची कीड लागली आहे. रेशन कार्ड मिळवणे हा गरिबांचा हक्क असताना, या विभागात सामान्य जनतेचे रक्त शोषण्याचे काम एका खाजगी व्यक्तीकडून सुरू असल्याचा खळबळजनक आरोप पत्रकार तथा सामाजिक कार्यकर्ते सतीश बळवंतरकर यांनी केला आहे.तरी पुरवठा अधिकारी मोहोड यांचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येते.शासकीय नियम धाब्यावर बसवून गोरगरिबांची लूट करणाऱ्या या टोळी विरोधात थेट जिल्हाधिकारी आणि उपविभागीय अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार दाखल केल्याने संपूर्ण तालुक्यात खळबळ उडाली आहे. तहसील कार्यालयाच्या पुरवठा विभागात सध्या सरकारी कर्मचाऱ्यांपेक्षा खाजगी दलालांचाच रुबाब जास्त पाहायला मिळत आहे. अजित घोरवडे आणि नन्हेसाब नावाचे दोन खाजगी इसम कार्यालयात ठाण मांडून बसतात आणि शासकीय गोपनीय कागदपत्रे उघडपणे हाताळतात. नवीन रेशन कार्ड हवे असेल किंवा कुटुंबातील व्यक्तीचे नाव वाढवायचे असेल, तर या दलालांना प्रति कार्ड १,७०० ते २,००० रुपयांची लाच मोजावी लागत आहे. पैशांशिवाय इथे एकही फाईल पुढे सरकत नाही, हेच या पुरवठा विभागाचे कडू सत्य बनले आहे"प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य" या नियमाची बिलोली पुरवठा विभागात रोज होळी केली जात आहे. तालुक्यातील शेकडो विधवा, दिव्यांग, भूमिहीन आणि अत्यंत गरजू कुटुंबांचे अर्ज मागील दोन ते तीन वर्षांपासून कार्यालयाच्या कोपऱ्यात धूळ खात पडले आहेत. एकीकडे हे हक्काचे लाभार्थी रेशन कार्डसाठी हेलपाटे मारून थकत आहेत, तर दुसरीकडे दलालांचे खिसे गरम करणाऱ्या सधन आणि अपात्र व्यक्तींना अवघ्या काही दिवसांत नवीन रेशन कार्ड घरपोच दिले जात आहे. हा सरळ-सरळ गरिबांच्या हक्कावर टाकलेला दरोडाच आहे. कार्यालयातील हा सर्व काळाबाजार पुरवठा निरीक्षण अधिकारी सौ. सुषमा मोहोड यांच्या डोळ्यांदेखत सुरू आहे. शासकीय दालनात खाजगी लोकांची चाललेली ही 'दुकानदारी' आणि होणारी आर्थिक लूट याकडे मोहोड यांनी जाणीवपूर्वक डोळेझाक केली आहे, ज्यावरून या भ्रष्टाचारात त्यांची मूक संमती असल्याचे स्पष्ट दिसते. हा प्रकार लाचलुचपत प्रतिबंधक कायदा, १९८८ च्या अंतर्गत गंभीर गुन्हा असल्याने संबंधित अधिकारी आणि दलालांवर थेट फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी करण्यात आली आहे.हा विषय थेट सामान्य जनतेच्या पोटाशी संबंधित असल्याने पत्रकार सतीश बळवंतकर यांनी प्रशासनाला १५ दिवसांचा अल्टिमेटम दिला आहे. या कालावधीत विशेष पथकाद्वारे चौकशी करून दोषींवर निलंबनाची व फौजदारी कारवाई न झाल्यास, पीडित नागरिकांना सोबत घेऊन बिलोली तहसील कार्यालयासमोर तीव्र स्वरूपाचे आंदोलन आणि उपोषण छेडण्याचा इशारा बळवंतकर यांनी दिला आहे.

# रखडलेल्या घरकुलांचा प्रश्न मार्गी लावा : आ. दाते

पारनेर : (स. गांवकरी)

पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते यांनी सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनात प्रधानमंत्री आवास योजना आणि इतर घरकुल योजनांतील रखडलेल्या कामांचा प्रश्न विधानसभेत उपस्थित करत हजारो गोरगरीब कुटुंबांना न्याय मिळवून देण्याचा ठाम प्रयत्न केला. राज्यातील लाखो लाभार्थ्यांची अपूर्ण घरकुले, रखडलेले हप्ते, तांत्रिक अडचणी आणि वाढत्या बांधकाम खर्चामुळे सर्वसामान्यांची होत असलेली परवड त्यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिली. आमदार दाते यांनी राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये प्रधानमंत्री आवास योजनेतील हजारो घरकुले अद्याप अपूर्ण असल्याचा मुद्दा उपस्थित केला. लाभार्थ्यांना वेळेवर हप्ते मिळत नसल्याने, SPARSH प्रणालीतील तांत्रिक त्रुटी, तसेच सिमेंट, लोखंड व इतर बांधकाम साहित्याच्या वाढत्या किमतींमुळे अनेक गरीब कुटुंबांना कर्ज काढून घराचे बांधकाम करावे लागत असल्याची वस्तुस्थिती त्यांनी मांडली. याशिवाय, जुनी घरे पाडल्यानंतरही नवीन घरकुल अपूर्ण राहिल्याने अनेक कुटुंबांना तात्पुरत्या निवाऱ्यात दिवस काढावे लागत असल्याचे सांगत, रखडलेले हप्ते तातडीने वितरित करावेत, तांत्रिक अडचणी दूर करून लाभार्थ्यांना दिलासा द्यावा आणि वाढत्या महागाईच्या पार्श्वभूमीवर अनुदानात वाढ करण्याची ठोस मागणी त्यांनी शासनाकडे केली. यावर उत्तर देताना ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी SNA SPARSH प्रणालीद्वारे लाभार्थ्यांच्या खात्यात थेट निधी वर्ग करण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती दिली.

# विद्यार्थ्यांना दर्जेदार गणवेश मिळाले पाहिजे : आ. दाते सर

पारनेर : (स. गांवकरी)

राज्यातील लाखो विद्यार्थ्यांना दर्जेदार शालेय गणवेश, बूट आणि पायमोजे उपलब्ध व्हावेत, तसेच वाढत्या महागाईच्या पार्श्वभूमीवर मोफत शालेय गणवेश योजनेतील आर्थिक तरतूद वाढविण्यात यावी, असी आग्रही मागणी सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनात लक्षवेधी प्रश्न उपस्थित करत आ. दाते यांनी शासनाचे लक्ष वेधले. यावर बोलताना आमदार दाते यांनी केंद्र शासनाच्या समग्र शिक्षा अभियान अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या मोफत शालेय गणवेश योजनेत प्रति विद्यार्थी दोन गणवेश, बूट व पायमोजे देण्यासाठी करण्यात आलेली आर्थिक तरतूद वाढत्या महागाईच्या तुलनेत अपुरी पडत असल्याचा मुद्दा मांडला. कमी निधीमुळे विद्यार्थ्यांना दर्जेदार साहित्य मिळण्यात अडचणी निर्माण होत असून, पालकांकडून निधी वाढविण्याची मागणी सातत्याने होत असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले. यासोबतच, विद्यार्थ्यांना अधिक चांगल्या दर्जाचे गणवेश उपलब्ध करून देण्यासाठी प्रति विद्यार्थी आर्थिक तरतूद वाढविणे, निधी वितरण प्रक्रियेत सुधारणा करणे आणि शालेय गणवेश योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत शासन कोणती पावले उचलत आहे, अशी विचारणा त्यांनी केली.

यावर उत्तर देताना शालेय शिक्षण राज्यमंत्री दादाजी भुसे यांनी शासनाने ६ जुलै २०२३ च्या निर्णयानुसार प्रति विद्यार्थी दोन गणवेशांसाठी ₹६०० तसेच एक जोडी बूट व दोन जोड पायमोज्यांसाठी ₹१७० इतकी आर्थिक तरतूद निश्चित केल्याची माहिती दिली. तसेच, २१ मे २०२६ च्या शासन निर्णयानुसार विद्यार्थ्यांना अधिक दर्जेदार गणवेश उपलब्ध करून देण्यासाठी शासनाच्या अनुदानाव्यतिरिक्त शाळा व्यवस्थापन समित्यांनी लोकसहभाग अथवा CSR निधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करण्याच्या सूचना देण्यात आल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शैक्षणिक सुविधा मिळाव्यात, आर्थिक दुर्बल कुटुंबांवरील भार कमी व्हावा आणि प्रत्येक विद्यार्थ्याला सन्मानाने शिक्षण घेता यावे, या उद्देशाने आमदार काशिनाथ दाते यांनी उपस्थित केलेल्या या लक्षवेधीची सभागृहात दखल घेण्यात आली.

# दोन सख्खे भाऊ लेफ्टनंट पदावर हा दुर्मिळ योग

डॉ. भाऊसाहेब खिलारी : आम्ही टाकळीकर व ढोकेश्वर विद्यालय यांच्या वतीने भव्य नागरी सत्कार

टाकळी ढोकेश्वर : (स. गांवकरी)

पारनेर येथील ले. कर्नल प्रकाश गायकवाड व ले. कर्नल प्रसाद गायकवाड हे दोन सख्खे भाऊ आई, वडील, शिक्षक यांच्याकडून प्रेरणा घेऊन ध्येय ठरवून, मोठे स्वप्न पाहून सैन्यात लेफ्टनंट पदापर्यंत वयाच्या 23 व्या व 21वयातच पोहोचले हा दुर्मिळ योग असावा असे प्रतिपादन जिल्हा मराठा संस्थेचे गव्हर्निंग कौन्सिल सदस्य डॉ. भाऊसाहेब खिलारी यांनी केले.

ढोकेश्वर विद्यालय व आम्ही टाकळीकर यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम आयोजित केला होता. त्या प्रसंगी डॉ. खिलारी बोलत होते.

यावेळी ले. क. प्रकाश व प्रसाद यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले ते म्हणाले, 8वी, 9वी व 10वी हे जीवनाचे ध्येय ठरविण्याची वेळ आहे तर 11 वी, 12 वी ही गोल्डन वेळ आहे. यावेळी जीवनातील बेस्ट अभ्यास करण्याची गरज आहे. आई -वडिलांसाठी, विद्यालयासाठी, गावासाठी, देशासाठी काम करा.

याप्रसंगी, सामाजिक कार्यकर्ते पंडीत नाना झावरे, प्राचार्य लक्ष्मणराव मतकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

यावेळी नवोदय विद्यालयाचे विद्यार्थी, प्र. ग. खिलारी पाटील या विद्यालयाचे विद्यार्थी उपस्थित होते, प्राचार्य बाळासाहेब खिलारी, पर्यवेक्षक बाळासाहेब बाळासाहेब निवडुंगे, मेजर गणपत ठाणगे, आई मंदा गायकवाड, वडील भास्कर गायकवाड, नवोदय विद्यालयाचे खिलारे सर, बापूसाहेब रांधवण, गणेशजी गायकवाड, डॉ. नरेंद्र मुळे, प्रविण झावरे, अशोक गांगड, पत्रकार विनोदजी गायकवड, संतोषजी कोरडे, वसंतजी रांधवण, अतुल सैद, अविनाशजी भालके, निलम खिलारी, वैशाली गायखे, दादाभाऊ नवले, प्रताप खिलारी, संतोषजी सोनवळे, उपप्राचार्य विरेंद्र धनशेट्टी, प्रा. कोठावळे, प्रा. सुरोशी, प्रा. आल्हाट, प्रा. घुले, डॉ. वीर, चौरे सर, भालेकर सर, चव्हाण सर, रवी मते इत्यादी पालक आणि शिक्षक उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भाऊसाहेब हिंगडे यांनी केले तर आभार बाबासाहेब जाधव यांनी मानले.




### विद्यालयास स्मार्ट बोर्ड देणार

विद्यालयातील वैद्यकीय व अभियांत्रिकी शाखेत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या अभ्यासासाठी इंटरॲक्टिव्ह स्मार्ट बोर्ड आम्ही टाकळीकर ग्रामविकास प्रतिष्ठान लोकसहभाग व माजी विद्यार्थी यांच्या सहयोगातून लवकरच देण्यात येणार असल्याची माहिती यावेळी प्रतिष्ठानचे संस्थापक, पत्रकार चाँद शेख यांनी प्रास्ताविकात दिली.

# सारखनी येथे महाआरोग्य शिबिर व रुग्णवाहिका लोकार्पण उत्साहात

किनवट : (स. गांवकरी)

किनवट तालुक्यातील सारखनी येथे शिवसेना नेते विशाल जाधव यांच्या पुढाकारातून हरित क्रांतीचे प्रणेते, महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री स्वर्गीय वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त दिनांक १ जुलै रोजी आयोजित करण्यात आलेले महाआरोग्य सर्व रोगनिदान शिबिर व रुग्णवाहिका लोकार्पण सोहळा मोठ्या उत्साहात आणि जनसामान्यांच्या उत्स्फूर्त प्रतिसादात पार पडला. या कार्यक्रमाला खासदार डॉ. श्रीकांत एकनाथ शिंदे, खासदार नागेश पाटील आष्टीकर (हिंगोली), माजी खासदार आनंद परांजपे, आमदार बाबुराव कदम कोहळीकर, शिवसेना संपर्कप्रमुख आनंदराव जाधव यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी उपस्थित मान्यवरांचे शिवसैनिक व नागरिकांच्या वतीने जल्लोषात स्वागत करण्यात आले.



कार्यक्रमात बोलताना खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी समाजहिताला सर्वोच्च प्राधान्य देत ग्रामीण व दुर्गम भागातील नागरिकांपर्यंत दर्जेदार आरोग्यसेवा पोहोचविण्यासाठी अशा महाआरोग्य शिबिरांची आवश्यकता अधोरेखित केली. आरोग्य तपासणी, वेळेवर निदान आणि उपचारामुळे अनेक गंभीर आजारांवर मात करता येते. त्यामुळे नागरिकांनी अशा शिबिरांचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी लोकार्पण करण्यात आलेली रुग्णवाहिका दुर्गम भागातील गरजू व आपत्कालीन परिस्थितीतील रुग्णांसाठी मोठा आधार ठरेल. वेळेत वैद्यकीय सेवा उपलब्ध झाल्यास अनेकांचे प्राण वाचू शकतात, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. तसेच राज्याचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्यनेते एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली राज्यभर राबविण्यात येत असलेल्या जनहिताच्या व विकासाभिमुख योजनांची माहिती देताना, सर्वसामान्यांच्या प्रश्नांना प्राधान्य देणारे शासन म्हणून राज्यातील जनतेचा शिवसेनेवरील विश्वास दिवसेंदिवस अधिक दृढ होत असल्याचे त्यांनी नमूद केले. नांदेड जिल्ह्याच्या विकासासाठी खासदार नागेश पाटील आष्टीकर यांच्यासह स्थानिक लोकप्रतिनिधी व पदाधिकाऱ्यांच्या माध्यमातून विकासकामांना गती दिली जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

कार्यक्रमादरम्यान स्थानिक पदाधिकारी व नागरिकांनी परिसरातील विविध विकासकामे, आरोग्य सुविधा, रस्ते, पिण्याचे पाणी तसेच इतर मूलभूत सुविधांबाबतच्या मागण्या मान्यवरांसमोर मांडल्या. या सर्व मागण्यांचा सकारात्मक विचार करून आवश्यक त्या विकासकामांसाठी शासनस्तरावर पाठपुरावा करण्यात येईल, असे आश्वासन यावेळी देण्यात आले.

कार्यक्रमाचे संयोजक विशाल जाधव यांनी उपस्थित सर्व मान्यवरांचे स्वागत करून या महाआरोग्य शिबिराच्या माध्यमातून ग्रामीण भागातील नागरिकांना मोफत आरोग्य तपासणी व उपचारांचा लाभ मिळावा, हा या उपक्रमामागील उद्देश असल्याचे सांगितले. यावेळी शिवसेना सचिव भाऊसाहेब चौधरी, पोहरादेवी संस्थानचे महंत जितेंद्र महाराज, जिल्हाप्रमुख विवेक देशमुख, महिला जिल्हाप्रमुख शीतलताई बांगे, अपर्णा नेरळकर, मीनल पाटील, युवासेना जिल्हाप्रमुख संदेश पाटील, जिल्हा सचिव मनोज तिरमनवार, किनवट तालुकाप्रमुख बालाजी मुरकुटे,किनवट शहरप्रमुख सुरज सातुरवार, माहूर तालुका प्रमुख सुदर्शन नाईक, युवासेना तालुकाप्रमुख अजय कदम, सोनू चौधरी, माहूर शहर प्रमुख विकास कपाटे, दया पाटील यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते, वैद्यकीय अधिकारी आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ३८ए, सोमेश्वर अपार्टमेंट, अदाते/शिंदे हॉस्पिटलजवळ, पुरूषोत्तम व्हिला समोर, वडगांव बुद्रुक, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

## थोडक्यात पण महत्वाचे




### प्रियांशी मृत्यूची व महिलेच्या फरपट प्रकरणी उच्चस्तरीय चौकशी करावी

पारनेर (स. गांवकरी) : राज्यातील आरोग्य व्यवस्थेतील निष्काळजीपणामुळे सर्वसामान्य नागरिकांना जीव गमवावा लागत असल्याच्या गंभीर पार्श्वभूमीवर पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते यांनी सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशन (जून-जुलै २०२६) मध्ये औचित्याच्या मुद्द्यावर दोन अत्यंत वेदनादायी घटनांचा विषय सभागृहात मांडत शासनाचे लक्ष वेधले. आमदार दाते यांनी सुपा (ता. पारनेर) येथील अवघ्या सहा वर्षीय प्रियांशी बागडे हिच्या मृत्यूचा मुद्दा उपस्थित करत, डोळ्याच्या तिरळेपणावरील शस्त्रक्रियेसाठी पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात दाखल करण्यात आलेल्या प्रियांशीचे सर्व वैद्यकीय अहवाल सामान्य असतानाही, शस्त्रक्रियेपूर्वी डोळ्यात औषधी ड्रॉप टाकल्यानंतर तिची प्रकृती अचानक बिघडून रक्ताच्या उलट्या झाल्या आणि तिचा दुर्दैवी मृत्यू झाला. या संपूर्ण घटनेची निष्पक्ष चौकशी करून जबाबदारांवर कठोर कारवाई करण्याची त्यांनी मागणी केली. याचबरोबर राळेगण थेरपाळ (ता. पारनेर) येथील एका गर्भवती महिलेची झालेली फरपटही त्यांनी सभागृहात मांडली. निघोज ग्रामीण रुग्णालयातून जिल्हा रुग्णालय, तेथून छत्रपती संभाजीनगर, पुढे मुंबईतील केईएम रुग्णालय आणि अखेरीस वाडिया बालरुग्णालय असा जीवघेणा प्रवास करत आई आणि नवजात बालकाला प्रचंड मानसिक व शारीरिक त्रास सहन करावा लागल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले. आरोग्य यंत्रणेतील समन्वयाच्या अभावामुळे नागरिकांची होत असलेली ही गैरसोय अत्यंत गंभीर असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या दोन्ही घटनांची शासनाने उच्चस्तरीय समितीमार्फत सखोल चौकशी करावी, दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करावी आणि भविष्यात अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी आरोग्य व्यवस्थेत प्रभावी सुधारणा कराव्यात, अशी ठाम मागणी आमदार काशिनाथ दाते यांनी सभागृहात केली.

### पालघर जिल्ह्यात जुलैभर 'डेंग्यू प्रतिरोध महिना'

पालघर (स. गांवकरी) :डेंग्यूसह इतर डासजन्य आजारांचा वाढता धोका लक्षात घेऊन जिल्हा परिषद पालघरच्या आरोग्य विभागातर्फे संपूर्ण जुलै २०२६ हा 'डेंग्यू प्रतिरोध महिना' म्हणून विविध जनजागृती आणि प्रतिबंधात्मक उपक्रमांनी साजरा करण्यात येणार आहे. राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार जिल्हाभर व्यापक लोकसहभागातून हे अभियान राबविण्यात येणार असून, नागरिकांनी सक्रिय सहभाग घेऊन डेंग्यूमुक्त पालघरच्या संकल्पाला बळ द्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे. यावर्षी "डेंग्यू नियंत्रणासाठी लोकसहभाग : साचलेल्या पाण्याची तपासणी करा, स्वच्छता राखा आणि पाण्याची भांडी झाकून ठेवा" या घोषवाक्याखाली विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे, ग्रामपंचायती, नगरपरिषदा, शाळा-महाविद्यालये तसेच विविध शासकीय विभागांच्या समन्वयातून हा विशेष अभियान प्रभावीपणे राबविण्यात येणार आहे. या अभियानांतर्गत ग्रामसभा, प्रभातफेरी, जनजागृती रॅली, घरभेटी, ताप सर्वेक्षण, कंटेनर सर्वेक्षण, स्वच्छता मोहीम, शाळांमधील चित्रकला, निबंध, पोस्टर व रांगोळी स्पर्धा, महिला बचत गटांच्या बैठका, आशा स्वयंसेविका व आरोग्य कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण, गप्पी मासे सोडण्याचे कार्यक्रम तसेच माहिती-शिक्षण-संवाद (IEC) उपक्रमांसह विविध लोकसहभागात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.

### विद्युतीकरण घोटाळा दडपण्याचा प्रयत्न?

देगलूर (स. गांवकरी) : देगलूर तालुक्यात अनुसूचित जाती व नवबौद्ध वस्ती विकास योजनेंतर्गत सन २०२५-२६ मध्ये झालेल्या विद्युतीकरण कामांतील आर्थिक अनियमिततेचे प्रकरण आता अधिकच गाजू लागले असून चौकशीच्या नावाखाली संबंधित अधिकारी हे एकमेकांवर जबाबदारी ढकलत प्रकरण थंडबस्त्यात टाकण्याचा प्रयत्न करीत असल्याचा आरोप युवासेना (शिंदे गट) जिल्हाध्यक्ष नामदेव रामराव थडके पाटील यांनी केला आहे. जिल्हाधिकाऱ्यांकडे दाखल केलेल्या तक्रारीत गटविकास अधिकारी श्रीकांत बळदे, संबंधित ग्रामसेवक आणि कंत्राटदार यांनी संगनमत करून शासनाच्या कोटी रुपयांच्या निधीचा अपहार केल्याचा आरोप करण्यात आला आहे. सुंडगी, मंगाजीवाडी, बोरगाव, मेदनकलूर, माळेगाव, तूपशेळगाव, देवापूर, अल्लूर, बळेगाव, शिळवणी, भूतन हिप्परगा, गवडगाव, तडखेल, बागन टाकळी, सुगाव, मरखेल, काटेवाडी, चैनपूर आदी गावांतील कामांची प्रत्यक्ष पाहणी केल्यास मोठा गैरव्यवहार उघड होईल, असा दावा तक्रारीत करण्यात आला आहे.

### ढिसाळ वीज व्यवस्थेवर आ. अंतापूरकरांचा विधानसभेत प्रहार

देगलूर (स. गांवकरी) : बिलोली विधानसभा मतदारसंघातील महावितरणच्या ढिसाळ, नियोजनशून्य आणि निष्काळजी कारभाराचा प्रश्न आमदारांनी विधानसभेत उपस्थित करत शासनाचे लक्ष वेधले. वारंवार होणारा वीजपुरवठा खंडित होणे, नादुरुस्त डी.पी. वेळेत न बदलणे, पाणीपुरवठा योजना ठप्प होणे, शेतकऱ्यांना अपुरा वीजपुरवठा तसेच लोकप्रतिनिधींना त्रास दिला जात असल्याच्या गंभीर बाबी सभागृहात मांडत आ.अंतापूरकर यांनी विज पुरवठा सुरळीत करण्याची मागणी केली. आ. अंतापूरकरांनी सभागृहात सांगितले की, भर पावसाळ्यातही मतदारसंघातील अनेक गावांमध्ये अनेक दिवस वीजपुरवठा खंडित राहत असल्याने नागरिकांना पिण्याच्या पाण्याच्या गंभीर समस्येला सामोरे जावे लागत आहे. बिलोली तालुक्यातील किनाळा गावात सलग तीन दिवस संपूर्ण गाव अंधारात असल्याचा उल्लेख करत, स्थानिक लोकप्रतिनिधी आणि ग्रामस्थांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतरही नवीन डी.पी. उपलब्ध करून देण्यात आलेली नसल्याबद्दल त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.

### दोषी कंत्राटदारावर कारवाई करून ब्लॅकलिस्ट करण्याची मागणी

किनवट (स. गांवकरी) : किनवट शहरातील शिवाजीनगर रेल्वे अंडरब्रिजच्या दुरुस्तीचे काम २६ जूनपर्यंत पूर्ण होणार असल्याचे रेल्वे प्रशासनाने यापूर्वी जाहीर केले होते. मात्र जुलै महिना सुरू होऊनही काम पूर्ण झाले नसल्याने नागरिकांचा संयम सुटू लागला आहे. या पार्श्वभूमीवर शिक्षक नेते संतोष दासरवार यांनी तीव्र नाराजी व्यक्त करत संबंधित कंत्राटदारावर दंडात्मक कारवाई करून त्याला ब्लॅकलिस्ट करण्याची मागणी केली आहे. संतोष दासरवार यांनी विविध प्रसारमाध्यमांशी दूरध्वनीद्वारे संवाद साधत अंडरब्रिजचे काम रखडल्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत असल्याचे सांगितले. सध्या पावसाळ्याचे दिवस सुरू असून शिवाजीनगर अंडरब्रिज बंद असल्यामुळे सुमारे २२ गावांतील नागरिकांची वाहतूक प्रभावित झाली आहे.

# डोल्हारी बुद्रुक येथे 'विकसित भारत-रोजगार आणि आजीविका हमी अभियान' अंतर्गत विविध विकासकामांचा शुभारंभ

(स. गांवकरी)

केंद्र शासनाने १ जुलै २०२६ पासून देशभर सुरू केलेल्या 'विकसित भारत-रोजगार आणि आजीविका हमी अभियान (ग्रामीण) (VB-GRAMG)' या नव्या अभियानाच्या पार्श्वभूमीवर राज्यस्तरीय जनसंमेलन व योजना शुभारंभ कार्यक्रमाच्या अनुषंगाने गुरुवारी मौजे डोल्हारी बुद्रुक, खोमारपाडा (ता. विक्रमगड) येथे विविध मनरेगा विकासकामांचा शुभारंभ करण्यात आला.





जिल्हा परिषद पालघरचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे यांच्या शुभहस्ते लाभार्थ्यांच्या विविध विकासकामांना प्रारंभ करण्यात आला. यामध्ये श्री. जिवब लक्ष्मण टोकरे यांच्या कुक्कुटपालन शेडचे काम, विखुरलेल्या स्वरूपातील वृक्षलागवड, श्री. सुनील कान्हा टोकरे यांचा गोठा तसेच श्री. अजय अर्जुन टोकरे यांचा गोठा या कामांचा शुभारंभ करण्यात आला.

यावेळी उपजिल्हा कार्यक्रम समन्वय अधिकारी (मनरेगा) अतुल पारसकर यांच्यासह तालुकास्तरीय अधिकारी, कर्मचारी आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

१ जुलै २०२६ पासून सुरू झालेल्या 'विकसित भारत-रोजगार आणि आजीविका हमी अभियान' अंतर्गत ग्रामीण भागातील रोजगारनिर्मिती, शाश्वत उपजीविकेची साधने उपलब्ध करून देणे, नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन तसेच टिकाऊ विकासकामांना चालना देण्यावर विशेष भर देण्यात आला आहे. या अभियानाच्या माध्यमातून तंत्रज्ञानाचा वापर, पारदर्शक अंमलबजावणी, ग्रामसभेच्या सहभागातून विकास आराखडे तयार करणे आणि ग्रामीण अर्थव्यवस्था अधिक सक्षम करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे.

याअंतर्गत गोठे, कुक्कुटपालन शेड, वृक्षलागवड, जलसंधारण, शेततळी यांसारख्या रोजगाराभिमुख आणि शाश्वत मालमत्ता निर्माण करणाऱ्या कामांना प्राधान्य दिले जाणार असून, ग्रामीण कुटुंबांच्या उत्पन्नवाढीसाठी आणि रोजगाराच्या संधी वाढविण्यासाठी हे अभियान महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

**कार्यक्रमाच्या माध्यमातून विविध विकासकामांना प्रत्यक्ष प्रारंभ झाल्याने लाभार्थ्यांमध्ये समाधानाचे वातावरण असून, ग्रामीण विकासाला अधिक गती मिळेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.**

## जन्म-मृत्यू नोंदणीबाबत शासनाची प्रमाणित कार्यपद्धती लागू

ठाणे : (स. गांवकरी)

- नागरिकांनी विहित मुदतीत नोंदणी करून CRS पोर्टलद्वारेच प्रमाणपत्रे प्राप्त करावीत

जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९ तसेच महाराष्ट्र जन्म-मृत्यू नोंदणी नियम, २००० अंतर्गत जन्म, मृत्यू व उपजत मृत्यू घटनांची नोंदणी करणे ही प्रत्येक नागरिकाची कायदेशीर जबाबदारी असून राज्याचे मुख्य निबंधक, जन्म-मृत्यू, महाराष्ट्र राज्य यांनी जारी केलेल्या प्रमाणित कार्यपद्धतीनुसार (SOP) सर्व संबंधित निबंधकांनी कायद्यातील तरतुदींचे काटेकोर पालन करावे, अशा सूचना देण्यात आल्याची माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे यांनी दिली. जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायत, नगरपालिका, महानगरपालिका तसेच शासकीय व खासगी आरोग्य संस्थांमधील निबंधकांना याबाबत आवश्यक मार्गदर्शन करण्यात आले आहे. नव्या कार्यपद्धतीनुसार बालकाच्या जन्मानंतर २१ दिवसांच्या कालावधीत जन्मनोंदणी न झाल्यास संबंधित प्रकरणाची सखोल पडताळणी जिल्हा स्तरावरून करण्यात येणार आहे. नागरिकांनी जन्म अथवा मृत्यू घटना घडल्यानंतर निर्धारित मुदतीत संबंधित निबंधक कार्यालयात आवश्यक कागदपत्रांसह माहिती सादर करणे बंधनकारक आहे.

## शिर्डी विधानसभा मतदारसंघात मतदार यादी विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम सुरू

शिर्डी : (स. गांवकरी)

- गणना प्रपत्र न भरल्यास मतदार यादीतून नाव वगळले जाणार – उपविभागीय अधिकारी माणिक आहेर

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार २१८ शिर्डी विधानसभा मतदारसंघासह राज्यभरात 'मतदार यादी विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम -२०२६' राबविण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत ३० जून ते २९ जुलै २०२६ या कालावधीत मतदान केंद्रस्तरीय अधिकारी घरोघरी जाऊन मतदारांना गणना प्रपत्र (एन्युमरेशन फॉर्म-ईएफ) वितरित करीत आहेत. मतदारांनी हे प्रपत्र अचूक भरून संबंधित बीएलओकडे सादर न केल्यास त्यांचे नाव आगामी प्रारूप मतदार यादीत समाविष्ट होणार नाही, असे आवाहन शिर्डीचे उपविभागीय अधिकारी माणिक आहेर यांनी केले आहे. मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्याकडून प्राप्त झालेले गणना प्रपत्र अचूक भरून देणे प्रत्येक मतदारासाठी आवश्यक आहे. कुटुंबातील कोणतीही एक सज्ञान व्यक्ती स्वतःच्या तसेच कुटुंबातील इतर सदस्यांच्या वतीने हे प्रपत्र भरून त्यावर स्वाक्षरी करू शकते. प्रत्येक मतदाराने प्रपत्रावर लावण्यासाठी एक पासपोर्ट आकाराचा रंगीत फोटो तयार ठेवावा. ज्या मतदारांचे गणना प्रपत्र प्राप्त होणार नाही किंवा भरलेले प्रपत्र सादर केले जाणार नाही, अशा मतदारांची नावे ५ ऑगस्ट २०२६ रोजी प्रसिद्ध होणाऱ्या प्रारूप मतदार यादीतून वगळण्यात येणार आहेत.

ज्या मतदारांची २००२ च्या मतदार यादीशी अद्याप जुळवणी (मॅपिंग) झालेली नाही, त्यांनी आपल्या कुटुंबातील सज्ञान सदस्यांची किंवा आई, वडील, आजी अथवा आजोबा यांची आवश्यक माहिती संबंधित बीएलओकडे उपलब्ध करून द्यावी. योग्य जुळवणी झाल्यास पुढील सुनावणीची नोटीस मिळण्याची आवश्यकता टाळता येईल. मतदार यादीतील माहिती अद्ययावत करण्यासाठी आणि त्रुटी दूर करण्यासाठी मतदारांनी आवश्यक कागदपत्रे तयार ठेवावीत. १ जुलै १९८७ पूर्वी जन्मलेल्या व्यक्तींनी स्वतःचा जन्मदिनांक किंवा जन्मस्थळ सिद्ध करणारा कोणताही एक विहित पुरावा सादर करावा. १ जुलै १९८७ ते २ डिसेंबर २००४ या कालावधीत जन्मलेल्या व्यक्तींनी स्वतःचा तसेच आई किंवा वडील यांपैकी एकाचा विहित पुरावा सादर करावा. २ डिसेंबर २००४ नंतर जन्मलेल्या व्यक्तींनी स्वतःचा तसेच आई आणि वडील या दोघांचाही विहित पुरावा सादर करणे आवश्यक आहे. विहित पुराव्यांमध्ये जन्म प्रमाणपत्र, पासपोर्ट, शाळा सोडल्याचा दाखला किंवा माध्यमिक शालांत प्रमाणपत्र, सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले रहिवासी प्रमाणपत्र तसेच शासन, बँक किंवा टपाल विभागाने जारी केलेली ओळखपत्रे आदी कागदपत्रांचा समावेश आहे. या कार्यक्रमांतर्गत ३० जून ते २९ जुलै २०२६ या कालावधीत घरोघरी भेट देऊन गणना प्रपत्रांचे वितरण व संकलन करण्यात येणार आहे. ५ ऑगस्ट २०२६ रोजी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध केली जाईल. त्यानंतर ५ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर २०२६ या कालावधीत दावे व हरकती स्वीकारण्यात येतील.

# आदिवासी बहुल अभोण्याचा 'कृषी मित्र' : बांधावरचा डॉक्टर, मोबाईलवरचा प्राध्यापक विनोद पाटील

- तन नाशकासोबत 75 हजार झाडे वाटणारा पर्यावरणाचा पाईक विनोद पाटील
- मोबाईल वरून शेती फुलवणारा जादूगार कृषी मित्र पाटील
- बी बियाणे औषधे नाही तर नाती जपणारा दुकानदार विनोद पाटील

कळवण-अनिल पवार : (स. गांवकरी)





नाशिक जिल्ह्यातील डोंगरदऱ्यांनी वेढलेला आदिवासी बहुल कळवण तालुका. याच तालुक्यातील बार्डे-अभोना गावचा शेतकरी पुत्र विनोद रामदास पाटील आज 'कृषी मित्र' म्हणून गल्लीपासून दिल्लीपर्यंत पोहोचला आहे. ओम साईराम कृषी सेवा केंद्राच्या माध्यमातून बांधावर जाऊन मोफत सल्ला देणारा, मोबाईलवरून शेती फुलवणारा आणि तणनाशकासोबत झाडे वाटणारा हा पर्यावरणाचा पाईक प्रत्येक शेतकऱ्याच्या हृदयात घर करून बसला आहे.

**बांधावरचा सल्लागार, मनातला मित्र**

"दुकानात बसून खते-बियाणे विकणे हा धंदा झाला, पण शेतकऱ्याच्या बांधावर जाऊन त्याच्या डोळ्यातले अश्रू पुसणे ही सेवा आहे," हे तत्व विनोद पाटील यांनी पहिल्या दिवसापासून जपले. स्वतः शेतकरी पुत्र असल्याने शेतीची जाण व शेतकऱ्यांप्रति आदर त्यांच्या रक्तातच आहे. म्हणूनच शेतकऱ्याचा एक फोन आला की दुचाकी काढून ते थेट शेतात पोहोचतात. पिकाची पाने हातात घेऊन रोग ओळखतात, मातीचा अंदाज घेतात आणि मगच कोणते औषध, किती प्रमाणात फवारावे याचा माफक व मोफत सल्ला देतात.

"पाटील साहेबांनी सांगितलेले औषध फवारले आणि माझा 2 एकर टमाट्याचा प्लॉट वाचला. नाहीतर 3 लाखांचे नुकसान झाले असते," अशी कृतज्ञता बार्डे येथील आदिवासी शेतकरी रमेश गावित व्यक्त करतात. अशा शेकडो शेतकऱ्यांच्या व्यथा पाटील यांनी बांधावर जाऊन सोडवल्या आहेत.

**तणनाशकासोबत झाडे वाटणारा 'पर्यावरण मित्र'**

आदिवासी भागात जंगल व पर्यावरण जपण्याची संस्कृती आहे. तीच संस्कृती पाटील यांनी व्यवसायात आणली. तणनाशक किंवा कीटकनाशक घेणाऱ्या प्रत्येक शेतकऱ्याला ते आंबा, चिकू, जांभूळ, कडुलिंबाची रोपे भेट देतात. "एक एकरात 5 झाडे लावा. शेतीबरोबर निसर्गही जगला पाहिजे," हा त्यांचा आग्रह. गेल्या काही वर्षांत त्यांनी स्वतःहून 75 हजारांहून अधिक झाडे शेतकऱ्यांना भेट दिली आहेत. कळवणच्या डोंगराळ भागात आज ही झाडे बहरली आहेत. त्यामुळेच शेतकरी त्यांना 'पर्यावरण मित्र' म्हणतात.

**मोबाईलवरून शेती फुलवणारा जादूगार**

सकाळी दुकान, दुपारी शेतभेट आणि संध्याकाळी मोबाईल – हे पाटील यांचे रोजचे वेळापत्रक. त्यांच्या मोबाईलमध्ये 360 हून अधिक व्हॉट्सअ‍ॅप ग्रुप आहेत. कळवणच्या दुर्गम पाड्यांपासून ते वेगवेगळ्या राज्यांतील शेतकरी त्यांना प्रश्न विचारतात. रात्री 12 वाजताही पिकावर रोग पडल्याचा फोटो आला की पाटील लगेच उपाय सांगतात.

"महाराष्ट्रातूनच नव्हे तर संपूर्ण भारतातून मेसेज येतात. जितके प्रश्न येतील तितक्यांची उत्तरे मी देतो. कोणालाही नाराज करत नाही," असे ते सांगतात. युट्युब, फेसबुक, इन्स्टाग्रामवर लाईव्ह येऊन सेंद्रिय शेती, ठिबक, एकात्मिक कीड व्यवस्थापन यावर ते मार्गदर्शन करतात. लिहिता-वाचता न येणाऱ्या आदिवासी बांधवांसाठी ते व्हिडिओच्या भाषेत सल्ला देतात.

**अभोनापासून बोरगाव-पिंपळ्यापर्यंत विस्तार**

अभोना येथील नांदुरी रोडवर पहिले ओम साईराम कृषी सेवा केंद्र सुरू करताना शेतकऱ्यांचा विश्वास मिळवणे कठीण होते. मात्र प्रामाणिकपणा, अचूक सल्ला व माफक दर यामुळे शेतकरी आपोआप जोडले गेले. आज बोरगाव, पिंपळे येथेही त्यांच्या शाखा आहेत. "दुकानदारीपेक्षा नाते महत्वाचे. गरज नसताना महागडे औषध देऊ नये, हे माझे तत्व आहे," असे ते ठामपणे सांगतात.

**गरजूला मदतीचा हात, बाजारात नवनवीन उपक्रम**

आदिवासी भागातील अनेक शेतकऱ्यांकडे फवारणी पंप घेण्याइतपतही पैसे नसतात. अशा गरजूंना पाटील स्वतःच्या खिशातून पंप भेट देतात. सणासुदीला बियाण्यांवर सवलत देतात. बाजारात नवनवीन उपक्रम घेण्यात ते नेहमी अग्रेसर असतात. 'पाटील आहे तोपर्यंत शेतीची चिंता नाही' असा विश्वास शेतकऱ्यांच्या मनात निर्माण झाला आहे.

> "शेतकरी जगला तर देश जगेल. माझ्यामुळे एका शेतकऱ्याचे जरी नुकसान टळले तरी तीच माझी कमाई," ही विनोद रामदास पाटील यांची भावना त्यांच्या प्रत्येक कृतीतून दिसते. कळवणच्या डोंगरदऱ्यातून सुरू झालेला हा प्रवास आज 'गल्लीपासून दिल्लीपर्यंत' पोहोचला आहे, हेच त्यांच्या निस्वार्थ सेवेचे यश आहे. - **गांवकरी, अनिल पवार**

**पुरस्कारांनी सन्मानित कर्तृत्व**

शेतकऱ्यांसाठी अविरत झटणाऱ्या विनोद पाटील यांच्या कार्याची दखल विविध संस्थांनी घेतली आहे. त्यांना 'कृषी रत्न पुरस्कार', 'कृषी मित्र पुरस्कार' व 'स्वामी विवेकानंद राष्ट्रीय प्रेरणा पुरस्कार' यांसारख्या मानाच्या पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे.

**कळवणचा आधारवड**

आज कळवण तालुक्यातील आदिवासी पाड्यांवर कुठेही जा, 'ओम साईरामचे विनोद पाटील' हे नाव आदराने घेतले जाते. बांधावर येऊन अश्रू पुसणारा, 75 हजार झाडे लावून पर्यावरण जपणारा आणि डिजिटल माध्यमातून देशभरातील शेतकऱ्यांना जोडणारा हा 'कृषी मित्र' खऱ्या अर्थाने आदिवासी बहुल कळवणचा आधारवड ठरला आहे.

• • •



विनोद पाटील (संचालक : ओम साई राम कृषी सेवा केंद्र)



## थोडक्यात पण महत्वाचे



### नूतन मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील यांनी विभागांना दिल्या भेटी

नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : नांदेड जिल्हा परिषदेचे नूतन मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक महेश पाटील यांनी आज जिल्हा परिषदेच्या विविध विभागांना भेट देऊन कामकाजाचा आढावा घेतला. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार तसेच संबंधित विभागांचे विभागप्रमुख उपस्थित होते. मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील यांनी सामान्य प्रशासन विभाग, ग्रामपंचायत विभाग, आरोग्य विभाग, लेखा विभाग, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, बांधकाम विभाग, शिक्षण विभाग आदी विभागांना भेटी देऊन तेथील कामकाजाची पाहणी केली. यावेळी त्यांनी कार्यालयीन स्वच्छतेला प्राधान्य देण्याच्या सूचना दिल्या. प्रत्येक कार्यालय स्वच्छ, नीटनेटके व लोकाभिमुख असावे. तसेच कार्यालयीन परिसराची नियमित स्वच्छता राखावी, असे निर्देश त्यांनी दिले. विविध कामांसाठी जिल्हा परिषदेत येणाऱ्या नागरिकांची कामे वेळेत व सुलभपणे मार्गी लावावीत. नागरिकांना कोणताही अनावश्यक त्रास होणार नाही, याची विभागप्रमुखांनी विशेष दक्षता घ्यावी, अशा सूचनाही त्यांनी दिल्या. भेटीदरम्यान मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील यांनी विभागप्रमुख व कर्मचाऱ्यांशी संवाद साधून विभागांच्या कामकाजाची माहिती जाणून घेतली. कार्यक्षम, पारदर्शक आणि लोककेंद्रित प्रशासनासाठी सर्वांनी समन्वयाने काम करत नागरिकांना दर्जेदार सेवा देण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.

### नांदेड दक्षिण विधानसभा मतदार संघात SIR अंतर्गत प्रत्यक्ष पाहणी

नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : २०२६ विशेष सखोल पुनरिक्षण (Special Intensive Revision – SIR) कार्यक्रमाच्या अनुषंगाने आज अपर जिल्हाधिकारी नांदेड डॉ. रत्नदीप गायकवाड यांनी 87 नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघातील सोमेश कॉलनी परिसरात प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी त्यांनी मतदारांच्या घरी भेट देऊन मतदार गणना फॉर्म स्वतः भरून घेतले तसेच फॉर्मचे प्रत्यक्ष डिजिटायझेशन करून संपूर्ण प्रक्रियेची पाहणी केली. SIR अभियान प्रभावीपणे व पारदर्शक पद्धतीने राबविण्याबाबत त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या. या पाहणीदरम्यान तहसीलदार तथा सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी संजय वारकड, सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी तथा उपायुक्त, महानगरपालिका नितीन गाढवे उपस्थित होते. यावेळी सोमेश कॉलनी येथील मतदार सुभाषचंद्र लीलाधर शहा तसेच मतदार सौ. श्वेता सुनीलराव वट्टमवार यांनी मतदार गणना प्रक्रियेत सहभाग नोंदविला. पाहणीदरम्यान मतदान केंद्रस्तरीय अधिकारी बीएलओ एम. एच. पवार, साहेबराव पांडुरंग जाधव तसेच बीएलओ पर्यवेक्षक ब्याले यांच्यासह संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



### ग्रामीण कुटुंबांना १२५ दिवसांच्या रोजगाराची वैधानिक हमी

ठाणे (स. गांवकरी) : ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबाला रोजगार, शाश्वत उपजीविका आणि सर्वांगीण विकासाच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने केंद्र शासनाच्या विकसित भारत – रोजगार व आजीविका मिशन ग्रामीण (VB-GRAMG) अभियानाचा जिल्हास्तरीय शुभारंभ आज पंचायत समिती, भिवंडी येथे उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमास उप जिल्हाधिकारी (VB-GRAMG) शशिकांत गायकवाड तसेच उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) प्रमोद काळे यांनी प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहून अभियानाच्या उद्दिष्टांबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. भारत सरकारच्या ग्रामीण विकास मंत्रालयांतर्गत राबविण्यात येणारी ही महत्त्वाकांक्षी योजना १ जुलै २०२६ पासून देशभर लागू करण्यात आली असून 'विकसित भारत २०४७' या राष्ट्रीय संकल्पनेशी ग्रामीण विकास आराखड्याची सांगड घालण्याचा तिचा मुख्य उद्देश आहे. या नव्या कायद्याद्वारे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा, २००५ ची पुनर्स्थापना करण्यात आली असून ग्रामीण कुटुंबांना प्रत्येक आर्थिक वर्षात १२५ दिवसांच्या रोजगाराची वैधानिक हमी देण्यात आली आहे. कार्यक्रमात मार्गदर्शन करताना उप जिल्हाधिकारी (VB-GRAMG) शशिकांत गायकवाड सांगितले की, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियमामुळे ग्रामीण भारतात रोजगारनिर्मिती, जलसंधारण, मृदसंधारण, वृक्षारोपण, ग्रामीण रस्ते, सिंचन आणि नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन यांसारख्या अनेक टिकाऊ कामांना चालना मिळाली. या यशस्वी प्रवासाला पुढे नेत, VB-GRAMG अभियानाच्या माध्यमातून रोजगाराबरोबरच शाश्वत आजीविका, कौशल्य विकास, स्थानिक संसाधनांचा प्रभावी वापर, महिला सक्षमीकरण आणि स्वयंरोजगाराला प्रोत्साहन देण्यात येणार आहे.

# राष्ट्रीय डॉक्टर्स डे प्रेरणादायी वातावरणात साजरा

## सेवाभाव, संवेदनशीलता आणि सामाजिक उत्तरदायित्वाचा विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभव

जुन्नर तालुका : (स. गांवकरी)



"वैद्य हा केवळ उपचार करणारा नसतो, तर तो आशा, विश्वास आणि नवजीवन देणारा देवदूत असतो," या भावनेचा प्रत्यय देणारा राष्ट्रीय डॉक्टर्स डे समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ आयुर्वेदिक महाविद्यालय व रिसर्च सेंटर,बेल्हे येथे अत्यंत उत्साहपूर्ण, प्रेरणादायी आणि समाजाभिमुख वातावरणात विविध उपक्रमांच्या माध्यमातून साजरा करण्यात आला. वैद्यकीय व्यवसायातील सेवाभाव, त्याग,संवेदनशीलता व सामाजिक बांधिलकी यांचे संस्कार विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबविण्याच्या उद्देशाने विशेष रुग्णालय भेटी, मार्गदर्शन सत्रे आणि सन्मान कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. डॉक्टर्स डे हा केवळ वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञांचा गौरव करण्याचा दिवस नसून, मानवतेच्या सेवेसाठी आयुष्य समर्पित करणाऱ्या डॉक्टरांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा सन्मानाचा दिवस आहे. रुग्णांच्या वेदना कमी करण्या साठी स्वतःच्या सुख-दुःखाचा विचार न करता अहोरात्र कार्य करणाऱ्या डॉक्टरांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन विद्यार्थ्यांमध्ये सेवाभावी आणि रुग्णकेंद्रित दृष्टिकोन विकसित व्हावा, या उद्देशाने महाविद्यालयाने हा उपक्रम राबविला. या निमित्ताने महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी आळेफाटा येथील युनिक हॉस्पिटलला भेट देत आधुनिक वैद्यकीय सेवेचा प्रत्यक्ष अनुभव घेतला.यावेळी डॉ.आकाश आवारी,डॉ.राहुल पावडे,डॉ. सतीश डेरे,डॉ.सतीश कसबे, डॉ. सचिन सुरनर,डॉ.शीतल कसबे आणि डॉ.जयश्री चव्हाण यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत आधुनिक उपचारपद्धती रुग्णांशी प्रभावी संवादकौशल्य, वैद्यकीय नैतिकता,व्यावसायिक जबाबदारी व समाजसेवेतील डॉक्टरांची भूमिका याविषयी मोलाचे मार्गदर्शन केले. समर्थ आयुर्वेदिक महाविद्यालयाच्या वतीने उपस्थित सर्व मान्यवर डॉक्टरांचा शाल, सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन कृतज्ञतापूर्वक गौरव करण्यात आला.त्यानंतर विद्यार्थ्यांनी डॉ.अनंतराव कणसे होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालय अंतर्गत कार्यरत सुमन व्यसनमुक्ती व पुनर्वसन केंद्रास भेट देत व्यसनमुक्ती प्रक्रियेचा अभ्यास केला. यावेळी डॉ. निखिल कणसे यांनी व्यसनमुक्तीचे सामाजिक महत्त्व, समुपदेशनाची भूमिका, पुनर्वसन प्रक्रियेतील विविध टप्पे आणि समाजामध्ये जनजागृतीची आवश्यकता याविषयी सखोल मार्गदर्शन केले. तसेच साबळे सर, मंदार डोंगरे, संदीप निकम आणि श्रीकांत चौगुले यांनी पुनर्वसन केंद्रातील कार्यपद्धती,लाभार्थ्यां च्या जीवनातील सकारात्मक परिवर्तन आणि मानसिक आधाराचे महत्त्व विद्यार्थ्यांसमोर प्रभावीपणे उलगडून सांगितले. या भेटीद्वारे विद्यार्थ्यांना औषधोपचाराबरोबरच मानसिक आधार, समुपदेशन आणि पुनर्वसन हेही आरोग्यसेवेचे अविभाज्य घटक असल्याची जाणीव झाली.या संपूर्ण उपक्रमाचे नियोजन डॉ. मधु सूदन कुऱ्हाडे,डॉ.रश्मी चव्हाण, डॉ.श्रवंती तोडचिरकर,डॉ. जयश्री मते,डॉ. कृतिका कांबळे, डॉ. स्नेहल गायकवाड आणि प्रा.मानसी गवळी यांनी केले.

यशवंत फापाळे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या उपक्रमाचे संस्थेचे अध्यक्ष वसंतराव शेळके,उपाध्यक्ष माऊली शेळके, सचिव विवेक शेळके, विश्वस्त वल्लभ शेळके, जिल्हा परिषदेच्या माजी सदस्या स्नेहलताई शेळके,कॅम्पस डायरेक्टर राजीव सावंत, प्राचार्य डॉ.संजय लोंढे तसेच प्रशासकीय अधिकारी प्रा. प्रदीप गाडेकर यांनी विशेष कौतुक केले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना वैद्यकीय व्यवसाया तील सेवा, संवेदनशीलता, करुणा,सामाजिक उत्तरदायित्व आणि रुग्णकेंद्रित दृष्टिकोनाची प्रत्यक्ष अनुभूती मिळाली. भविष्यात समाजाभिमुख, नैतिक मूल्यांनी समृद्ध, सेवाभावी आणि जबाबदार वैद्यकीय तज्ज्ञ घडविण्याच्या दिशेने अशा उपक्रमांचे महत्त्व अनन्यसाधारण असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

## तहसीलदार यांची चौफाळा भागात पाहणी

नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)

विशेष सखोल पुनरिक्षण (SIR) कार्यक्रमांतर्गत ०८७ नांदेड विधानसभा मतदारसंघातील चौफाळा भागास आज तहसीलदार तथा सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी संजय वारकड यांनी भेट देऊन कामकाजाची पाहणी केली.

यावेळी संबंधित भागातील सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी शेख, पर्यवेक्षक तसेच सुमारे ४० बीएलओ व सहाय्यक बीएलओ यांची बैठक घेण्यात आली. बैठकीत मतदार यादी विशेष सखोल पुनरिक्षणाचे काम अचूक, पारदर्शक व निर्धारित वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या. गणना फॉर्मचे वाटप, संकलन तसेच प्राप्त फॉर्मचे ॲपवर तात्काळ डिजिटायझेशन करण्याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. यासोबतच कामाचा आढावाही घेण्यात आला. बैठकीनंतर तहसीलदार संजय



वारकड यांनी चौफाळा येथील बालाजी कोकलवार यांच्या घरी भेट देऊन प्रत्यक्ष गणना फॉर्म भरून घेतला. त्यानंतर त्याचे त्वरित ॲपवर डिजिटायझेशन करून उपस्थित बीएलओ व सहाय्यक बीएलओ यांना प्रत्यक्ष प्रात्यक्षिकाद्वारे संपूर्ण प्रक्रिया समजावून सांगितली.

## डीजीपीयूमध्ये उद्योग–शैक्षणिक सहकार्याला बळ

### मॅनकाइंड फार्माचे वरिष्ठ अधिकारी अभय कुमार श्रीवास्तव यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

पुणे : (स. गांवकरी)

डॉ. डी. वाय. पाटील युनिटेक सोसायटीच्या ज्ञान प्रसाद ग्लोबल युनिव्हर्सिटी (DGPU) ने उद्योगाभिमुख शिक्षणाला अधिक बळकटी देण्यासाठी आपल्या स्कूल ऑफ फार्मसी अँड रिसर्च (DPGU SPR) मध्ये विशेष अकॅडेमिया–इंडस्ट्री इंटरॅक्शन सत्राचे आयोजन केले. या सत्रात मॅनकाइंड फार्मा लिमिटेडचे सिनियर प्रेसिडेंट – ऑपरेशन्स अभय कुमार श्रीवास्तव यांनी विद्यार्थी आणि प्राध्यापकांशी संवाद साधत औषधनिर्माण उद्योगातील बदलते प्रवाह, संधी आणि अपेक्षांबाबत मार्गदर्शन केले.



शैक्षणिक गुणवत्ता, संशोधनाधिष्ठित शिक्षण, नवोपक्रम आणि उद्योग सहकार्यावर भर देणाऱ्या डीजीपीयूच्या स्कूल ऑफ फार्मसी अँड रिसर्चमध्ये विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष उद्योगविश्वाशी जोडण्यासाठी अशा संवादात्मक उपक्रमांचे नियमित आयोजन केले जाते. या सत्रात प्राध्यापक विकास, उद्योगाच्या गरजांनुसार अभ्यासक्रम विकसित करणे, कौशल्यविकास, संयुक्त संशोधन, इंटर्नशिप, प्रमाणपत्र अभ्यासक्रम तसेच औषधनिर्माण क्षेत्रातील कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) चा वाढता वापर अशा विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

यावेळी बोलताना डॉ. सोमनाथ पी. पाटील, प्रो-चान्सलर, ज्ञान प्रसाद ग्लोबल युनिव्हर्सिटी, डॉ. डी. वाय. पाटील युनिटेक सोसायटी म्हणाले, "डीजीपीयूमध्ये विद्यार्थ्यांना आरोग्यसेवा आणि औषधनिर्माण क्षेत्रातील वेगाने बदलणाऱ्या गरजांसाठी सक्षम करण्याच्या उद्देशाने उद्योग आणि शैक्षणिक क्षेत्रातील अर्थपूर्ण सहकार्याला आम्ही प्राधान्य देत आहोत. अभय कुमार श्रीवास्तव यांसारख्या अनुभवी उद्योगतज्ज्ञांशी संवाद साधण्याची संधी विद्यार्थ्यांना व्यावहारिक ज्ञान, उद्योगाची सखोल समज आणि भविष्यातील करिअरसाठी आवश्यक दृष्टिकोन प्रदान करते."

अभय कुमार श्रीवास्तव, सिनियर प्रेसिडेंट – ऑपरेशन्स, मॅनकाइंड फार्मा लिमिटेड म्हणाले, "शैक्षणिक संस्थांमधील विद्यार्थ्यांशी संवाद साधणे हा नेहमीच समृद्ध करणारा अनुभव असतो. अशा व्यासपीठांमुळे विद्यार्थ्यांना उद्योगातील प्रत्यक्ष कार्यपद्धती, अपेक्षा आणि व्यावसायिक कौशल्यांची ओळख होते. डीजीपीयूने अशा उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांना उद्योगाशी जोडण्याचा घेतलेला पुढाकार निश्चितच कौतुकास्पद आहे."

विद्यापीठाच्या अनुभवाधारित शिक्षणाच्या दृष्टीकोनाविषयी बोलताना डॉ. रोहिणी एस. पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी (Chief Operating Officer), ज्ञान प्रसाद ग्लोबल युनिव्हर्सिटी, डॉ. डी. वाय. पाटील युनिटेक सोसायटी म्हणाल्या, "उद्योग क्षेत्राशी सातत्यपूर्ण संवाद हा आमच्या शैक्षणिक व्यवस्थेचा महत्त्वाचा भाग आहे.

## वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप

### समाजोपयोगी उपक्रमातून विकासभाऊ ताम्हाणे यांनी जपली सामाजिक बांधिलकी

जुन्नर तालुका : (स. गांवकरी)

माजी ग्रामपंचायत सदस्य, डिसेंट फाउंडेशनचे कार्यशील सदस्य व सामाजिक कार्यकर्ते विकासभाऊ ताम्हाणे यांच्या वाढदिवसानिमित्त जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, गोळेगाव येथे विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे मोफत वाटप करण्यात आले."खरा वाढदिवस तोच,जो समाजासाठी प्रेरणादा- यी ठरतो!" या संदेशालासाजेसा हा उपक्रम उत्साहात पार पडला.

यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांना कंपास पेट्या, पेन, पेन्सिल,वह्या तसेच इतर आवश्यक शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला असून शिक्षणासाठी आवश्यकसाहित्य मिळाल्याने त्यांना मोठा आधार मिळाला.यावेळी डिसेंट फाउंडेशचे संस्थापक जितेंद्र बिडवई ,जयवंत डोके ,मुकुंद राक्षे ,शामसुंदर लोखंडे, मुख्याध्यापक मोहन नाडेकर,





शालेय व्यवस्थापन समिती सदस्या सुप्रिया बिडवई, पल्लवी वाणी, प्रियांका ताम्हाणे,आदी मान्यवर शिक्षकवृंद, ग्रामस्थ, पालक,डिसेंट फाउंडेशनचे पदाधिकारी व सदस्य तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी बोलताना विकासभाऊ ताम्हाणे यांनी, "वाढदिवस हा केवळ आनंद साजरा करण्याचा दिवस नसून समाजाप्रती आपली जबाबदारी पार पाडण्याची संधी आहे. विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी आपण सर्वांनी हातभार लावला पाहिजे," असे प्रतिपादन केले.

शाळेचे मुख्याध्यापक मोहन नाडेकर यांनी या समाजोपयोगी उपक्रमाबद्दल श्री. विकासभाऊ ताम्हाणे व डिसेंट फाउंडेशनचे आभार मानत,अशा उपक्रमां मुळे विद्यार्थ्यांना शिक्षणाची प्रेरणा मिळत असल्याचे सांगितले.कार्यक्रमाचे नियोजन व यशस्वी आयोजन डिसेंट फाउंडेशनच्या कार्यकर्त्यांनी केले. उपस्थितांनी विकास ताम्हाणे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देत त्यांच्या सामाजिक कार्याचे कौतुक केले.

## "एक होतं माळीण" चित्रपटाचा थरकाप उडवणारा टीजर

पुणे : (स. गांवकरी)

माळीण गाव हे पुणे जिल्ह्याच्या आंबेगाव तालुक्यातील एक गाव. पाऊस पडावा म्हणून वरूण राजाची प्रार्थना करणारे माळीण गावातील ग्रामस्थ आदल्या दिवशी रात्री गाढ झोपी गेले आणि त्याच रात्री झालेल्या अतिवृष्टीमुळे संपूर्ण गावच त्या पावसात वाहून गेलं. कल्पनाही करता येणार नाही अशी भयावह परिस्थिती निर्माण झाली. याच सत्यघटनेवर आधारित "एक होतं माळीण" हा चित्रपट येत्या २४ जुलैला संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होत असून नुकताच या चित्रपटाचा टीजर सोशल मीडियावर लाँच करण्यात आला आहे. ड्रीम डॉट क्रिएशन प्रोडक्शनच्या संतोष जगन्नाथ म्हात्रे यांनी या चित्रपटाची निर्मिती केली आहे, तर रुपेश राणे, अरूण कोंजे, दत्तात्रय गायकर, राजु राणे हे सहनिर्माते आहेत. रॅन स्टुडिओज प्रोडक्शन चे नंदू मेहेर, रुपेश राणे, अरुण कोंजे, अक्षय म्हात्रे व राजु



राणे यांनी या चित्रपटाची प्रस्तुती केली आहे. चित्रपटाची संकल्पना, कथा, पटकथा राजु राणे यांची असून दत्तात्रय गायकर आणि राजु राणे यांनी चित्रपटाचे लेखन, संवाद आणि दिग्दर्शन केले आहे. प्रशांत मोहिते, अश्विनी कासार, अभिजित श्वेतचंद्र, सिद्धी पाटणे, अनिल नगरकर, प्रशांत तपस्वी, रामचंद्र धुमाळ, अक्षय म्हात्रे, दीपज्योती नाईक, अनुज ठाकरे अशा उत्तम कलावंतांच्या चित्रपटात प्रमुख भूमिका आहेत. राजा फडतरे यांनी छायांकन, युवराज गोंगले यांनी गीतलेखन आणि संगीत दिग्दर्शन केलं असून अजय गोगावले, जावेद अली, आनंदी जोशी व हरिदास शिंदे यांनी चित्रपटातील गाणी गायली आहेत.

# गरीब व होतकरू विद्यार्थ्यांसाठी 'लोकनेते सुधीरभाऊ मुनगंटीवार सामूहिक अभ्यास केंद्र' सुरू

### शिक्षण हेच समाजपरिवर्तनाचे प्रभावी माध्यम; प्रत्येक विद्यार्थ्याला गुणवत्तापूर्ण शिक्षणाची समान संधी मिळाली पाहिजे – बाबासाहेब भागडे

वरोरा : (स. गांवकरी)

समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल, होतकरू व गुणवंत विद्यार्थ्यांना शिस्तबद्ध, प्रेरणादायी आणि दर्जेदार शैक्षणिक वातावरण उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने *स्वर्गीय चंद्रभागाबाई नारायण घुमे बहुउद्देशीय संस्था, वरोरा* यांच्या वतीने लोकनेते सुधीरभाऊ मुनगंटीवार सामूहिक अभ्यास केंद्र' या महत्त्वाकांक्षी उपक्रमाचा शुभारंभ बुधवार, दि. १ जुलै रोजी सायंकाळी ७ वाजता जेतवन बुद्ध विहार, कॉलरी वॉर्ड, वरोरा येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. विशेष म्हणजे या अभ्यास केंद्राचे नियमित कामकाज कल्याणेश्वर हनुमान मंदिर





परिसरातील गुरुदेव सेवा मंडळाच्या प्रार्थना मंदिरात सुरू राहणार आहे.

कार्यक्रमाचे उद्घाटन भाजपचे ज्येष्ठ नेते बाबासाहेब भागडे यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष मारोतराव घुमेहोते.

उद्घाटनप्रसंगी बोलताना बाबासाहेब भागडे म्हणाले, शिक्षण हेच समाजपरिवर्तनाचे सर्वात प्रभावी माध्यम आहे. समाजातील प्रत्येक विद्यार्थ्याला, विशेषतः आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील मुलांना गुणवत्तापूर्ण शिक्षणाची समान संधी मिळाली पाहिजे. अशा उपक्रमांमधून विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, शिस्त आणि स्पर्धात्मकता निर्माण होते. लोकनेते सुधीरभाऊ मुनगंटीवार सामूहिक अभ्यास केंद्र हे भविष्यात अनेक गुणवंत विद्यार्थी घडविणारे प्रेरणास्थान ठरेल.

अध्यक्षीय भाषणात मारोतराव घुमे यांनी संस्थेच्या माध्यमातून शिक्षण, सामाजिक बांधिलकी आणि विद्यार्थी विकासासाठी सातत्याने उपक्रम राबविण्याचा निर्धार व्यक्त केला. संस्थेचे सचिव आशिष घुमे यांनी प्रास्ताविकातून या उपक्रमामागील प्रेरणा स्पष्ट करताना सांगितले की, आर्थिक अडचणींमुळे अनेक विद्यार्थ्यांना खासगी शिकवणीचा लाभ घेता येत नाही. अशा विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी योग्य वातावरण, गुणवत्तापूर्ण मार्गदर्शन आणि आत्मविश्वास देण्यासाठी या अभ्यास केंद्राची संकल्पना साकारण्यात आली. उद्घाटनाच्या दिवशीच ३० विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला असून, झोपडपट्टी परिसरातील विद्यार्थ्यांचा या उपक्रमात विशेष सहभाग असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाला वरोरा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक ओमप्रकाश सोनटक्के, नगर परिषदेच्या महिला व बालकल्याण सभापती रेखा तेलतुमडे, सार्वजनिक बांधकाम सभापती मनीष जेठानी, नगरसेविका मनीषा संजय दानव, डॉ. अंकुश आगलावे, डॉ. सागर वझे, सामाजिक कार्यकर्ते अमित चवले, 'गो विथ स्ट्रक्चर' उपक्रमाचे प्रणेते गोपाळ गुढधे, शेख जैरुद्दीन (छोटूभाई), योग शिक्षिका शीतल मिटकर यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. तसेच विद्यार्थी, त्यांचे पालक आणि कॉलरी वॉर्ड परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या उपक्रमाचे स्वागत केले.

कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन अशोक टिपले यांनी केले. या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संस्थेचे *सचिव आशिष घुमे, उपाध्यक्ष संजय दानव, सहसचिव रमेश वाटकर , कार्यकारिणी सदस्य सुरज घुमे, राहुल भोयर, ॲड. अरुणाताई जांभुळकर, कोमल फरकाडे, हर्षल दानव, तसेच कल्याणेश्वर हनुमान मंदिराचे सुनील इंगळे, सागर आत्राम, चेतन बुरडकर, नूतन बुरडकर, सार्थक नागपुरे, प्रशांत साळवे, गुरुदेव सेवा मंडळाच्या अध्यक्षा कांता उमरे आणि अजय बावणे यांनी अथक परिश्रम घेतले.

### स्पोकन इंग्लिश व योग प्रशिक्षणाला प्रारंभ

लोकनेते सुधीरभाऊ मुनगंटीवार सामूहिक अभ्यास केंद्रात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी नियमित स्पोकन इंग्लिशच्या वर्गांना सुरुवात होणार आहे.गो विथ स्ट्रक्चर उपक्रमाचे प्रणेते गोपाळ गुढधे हे विद्यार्थ्यांना स्पोकन इंग्लिशचे प्रशिक्षण देणार असून, मराठी माध्यमातील विद्यार्थ्यांमध्ये इंग्रजी संभाषण कौशल्य, आत्मविश्वास आणि व्यक्तिमत्त्व विकास घडविण्यावर विशेष भर दिला जाणार आहे. यासोबतच योग शिक्षिका शीतल मिटकर यांच्या मार्गदर्शनाखाली नियमित योगाभ्यासाचे वर्ग आयोजित करण्यात येणार आहेत. सामूहिक अभ्यास, योग, व्यक्तिमत्त्व विकास, करिअर मार्गदर्शन, वाचन संस्कृती आणि स्पर्धा परीक्षांची पूर्वतयारी यांसारखे विविध उपक्रम सातत्याने राबवून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्यात येणार आहे. विशेषतः आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि झोपडपट्टी परिसरातील विद्यार्थ्यांसाठी हे अभ्यास केंद्र नवी आशा आणि नवी दिशा ठरणार आहे.